# प्रकरण पहिले

# अ) विषय प्रवेश  ब) डांग: भौगोलिक परिसर

## अ) विषय प्रवेश

१. अ. १. प्रस्तावना

१. अ. २. लोकसाहित्याचा वारसा

१. अ. ३. लोकसाहित्य अभ्यासाची आवश्यकता

१. अ. ४. विषय निवडीमागील भूमिका

१. अ. ५. संशोधनाची ध्येय व उद्दिष्टे

१. अ. ६. संशोधनाची व्याप्ती

१. अ. ७. संशोधनाच्या मर्यादा

१. अ. ८. संशोधनपूर्व संशोधन: एक पाहणी

१. अ. ९. संशोधनाची कार्यपद्धती व तंत्रे

१. अ. १०. गृहीतके

**ब) डांग: भौगोलिक परिसर**

१. ब. १. प्रस्तावना

१. ब. २. डांग शब्दाचा अर्थ

१. ब. ३. भौगोलिक परिचय

१. ब. ४. धार्मिक जीवनाचा परिचय

१. ब. ५. सामाजिक जीवनाचा परिचय

१. ब. ६. डांग जिल्ह्याचा राजकीय इतिहास

१. ब. ७. शैक्षणिक परिचय

१. ब. ८. सद्यस्थिती

१. ब. ९. समारोप

संदर्भ

# प्रकरण पहिले

## अ) विषय प्रवेश  ब) डांग: भौगोलिक परिसर

---

## अ) विषय प्रवेश

**१. अ. १. प्रस्तावना:**

आपल्या देशात प्रादेशिक विविधतेनुसार वेगवेगळ्या बोलीभाषा बोलल्या जातात. या वेगवेगळ्या बोलीभाषांमध्ये वेगवेगळे लोकवाङ्मय प्रकार आढळून येतात. लोकांनी लोकांसाठी स्वतःच्या अंतप्रेरणेने निर्माण केलेले मौखिक स्वरूपातील साहित्य ते लोकसाहित्य असे आपणास म्हणता येते.

लोकसाहित्याची एकच एक निर्विवाद, निर्दोष आणि सर्वसमावेशक अशी व्याख्या कोणत्याही लोकसाहित्य अभ्यासकाला करता आल्याचे आढळत नाही. लोकसाहित्याची व्याप्ती खूप मोठी असल्याने हा संभ्रम लोकसाहित्य तज्ज्ञांमध्ये आढळतो. असे असले तरी या सगळ्यांनी आपापल्या परीने लोकसाहित्याचे महत्त्व, लोकसाहित्याची गरज, लोकसाहित्याचे वेगळेपण, लोकसाहित्याची वैशिष्ट्ये, लोकसाहित्याचा समाजजीवनातील उपयोग, लोकसाहित्याचा इतिहास इत्यादी वेगवेगळ्या दृष्टींनी समाजाला महत्त्व पटवून दिले आहे.

प्रस्तुत प्रकरणाच्या अ) भागात लोकसाहित्याचा वारसा, लोकसाहित्य अभ्यासाची आवश्यकता, विषय निवडीमागील भूमिका, संशोधनाची ध्येय व उद्दिष्टे, संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा, संशोधनपूर्व संशोधन: एक पाहणी, संशोधनाची कार्यपद्धती व तंत्रे, गृहीतके इत्यादींचा सखोल विचार केला आहे. याचे कारण प्रस्तुत संशोधन विषयाला मी कसा प्रवृत्त झालो? त्याची समाज उपयोगिता काय? हे थोडक्यात कळावे ही महत्त्वाकांक्षा.

**१. अ. २. लोकसाहित्याचा वारसा:**

आपला देश सांस्कृतिक विविधतेने नटलेला आहे. 'जसा देश तसा भेस' या म्हणीनुसार जशी भाषा तशी संस्कृती आणि जशी संस्कृती तसे त्यांचे लोकवाङ्मय. हा लोकवाङ्मयाचा किंवा लोकसाहित्याचा वारसा अनादी काळापासून जपून ठेवलेला दिसतो. अशाच प्रकारचा वारसा असलेले लोकसाहित्य डांग जिल्ह्यात पाहायला मिळते. हा प्रदेश छोट्या-मोठ्या टेकड्यांनी आणि जंगलांनी युक्त असा असून येथील बोलीभाषा डांगी या प्रादेशिक नावाने ओळखली जाते. या बोलीभाषेमधून लोकसाहित्यातील लोककथा, लोकगीते, लोकप्रथा, लोकसमज, लोकविद्या स्वत:च्या आविष्कारात दडलेल्या आहेत. यातून लोकजीवनातील लोकसंस्कृती, लोकजीवनाचे प्रतिबिंब, लोकजीवनातील

रीतीरिवाज आढळतात. गतकाळाच्या समाजजीवनातील अनेक घटना, रहस्य, रीतीरिवाज, बोलीची पूर्वरूपे यांचा उलगडा होण्याची शक्यता असते.येथील लोकसाहित्याला शेकडो वर्षांचा प्राचीन वारसा आहे. त्याचा थोडक्यात मराठी भाषिकांना परिचय व्हावा हा यामागील प्रामाणिक प्रयत्न आहे.

### १. अ. ३. लोकसाहित्य अभ्यासाची आवश्यकता:

"जंगलात, दऱ्याखोऱ्यात राहणाऱ्या जाती-जमातींची नवी पिढी जुने संस्कार सोडून नवे बदलते जीवन झपाट्याने स्वीकारत आहे. बदलता निसर्ग, नष्ट होणारी जंगले, आधुनिक तंत्रज्ञान आणि शहरांचे आकर्षण यामुळे हे तरुण आता महानगरांकडे धाव घेऊ लागले आहेत. त्यामुळे त्यांच्या पुढच्या पिढीला आपल्या पूर्वजांच्या जीवनरूढी सांगता येणार नाहीत आणि पिढ्यानपिढ्या चालत आलेला हा वैविध्यपूर्ण बोलीभाषांचा, वैविध्यपूर्ण संस्कृतीचा ठेवा नाहीसा होऊन जाईल. आदिवासीच नव्हे तर समाजातील सर्वच घटक मानवी संस्कृतीचा अमूल्य ठेवा हरवून बसण्याची शक्यता दिवसेंदिवस वाढत चालली आहे."[१] तसे होऊ नये म्हणून वेळीच लोकसाहित्याच्या रूपाने अक्षरबद्ध करून त्याला चिरकालित्त्व देणे गरजेचे आहे.

लोकसाहित्याच्या माध्यमातून "तत्कालीन जीवनदर्शन, रिती-भाती, सण-उत्सव, कुटुंबातील नातेसंबंध, उपजीविकेची साधने, खाण-पाण, प्राणी व देवदेवताविषयक कल्पनाबंध, तत्कालीन समाजस्थिती व परंपरा दर्शन, वीर पुरुषांचे चित्रण, भाषा-बोलीभाषा, व्यक्त झालेली ग्रामदैवते, वाद्य, आयुध, सांस्कृतिक मूल्यांचे दर्शन, अशुभ निवारण इत्यादी विशेष नोंदविता येतात."[२]

समाजाचा खरा इतिहास लोकसाहित्याच्या माध्यमातून उलगडता येतो. लोकसाहित्य हा विषय आंतरविद्याशाखीय असल्यामुळे ह्या लोकसाहित्याचा इतर शास्त्रांनाही उपयोग होतो. म्हणून लोकसाहित्य अभ्यासाची आज आवश्यकता आहे.

कोणत्याही बोलीचा किंवा भाषेचा अभ्यास करताना आपल्याला लोकसाहित्याचा आधार घ्यावा लागतो. कोणती बोली केव्हा आणि कशी उत्पन्न झाली? तिच्यात कसकसे बदल होत गेले? का होत गेले? तिची कारणे काय? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे आपल्याला लोकसाहित्याच्या माध्यमातून तपासून पाहता येतात.

लोकसाहित्य हे अनौपचारिक शिक्षणाचे एक प्रभावी माध्यम म्हणून ओळखले जाते. "दाराची कडी वाजवू नये नाहीतर कटकट होते, भांडणे होतात. दारात शिंकू नये, शिंकणे अशुभ असते व शिंकल्यावर उंबऱ्यावर पाणी घालावे. मांजर आडवी गेली तर काम होत नाही तेव्हा पाच पावले मागे सरावे. यासारखे समज गैरसमज. आपापल्या क्षेत्रदेवतांची पूजा कशी करावी, रांगोळी कशी व कोणती काढावी, सणाला काय करावे हे सारे अनौपचारिक शिक्षण आपल्याला लोककथा, लोकगीते, कहाण्या, म्हणी, वाक्प्रचार, दंतकथा, दैवतकथा यासारख्या लोकसाहित्याच्या अनेक प्रकारांतून

मिळते."[३] म्हणून यादृष्टीनेही विचार करता आपल्याला लोकसाहित्याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. असे एक ना अनेक फायदे कळत नकळत समाजाला होतात.

वरील विवेचन लक्षात घेऊनच याठिकाणी मी डांगी लोकसाहित्याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे. लोकसाहित्याचे वरील फायदे आपल्याला डांगी लोकसाहित्याच्या माध्यमातून प्रत्ययाला येतील असा विश्वास आहे.

### १. अ. ४. विषय निवडीमागील भूमिका:

१) मराठी लोकसाहित्याचा विचार करता डांगी लोकसाहित्य हा त्याचाच एक अमूल्य असा भाग असून त्याकडे मात्र मराठी अभ्यासकांचे आजतागायत दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते. याचे कारण डांग हा भूप्रदेश आज गुजरातमध्ये स्थित आहे. तिथली शैक्षणिक भाषा ही गुजराती आहे. म्हणून मराठी भाषिक अभ्यासक डांग भागाकडे दुर्लक्ष करतांना दिसून येतो. तरीही महाराष्ट्रीयन मराठी अभ्यासक ओरडून ओरडून सांगतात, की डांगी ही मराठीचीच एक बोली आहे. परंतु प्रत्यक्षात मात्र या बोलीविषयी कोणी अभ्यास करतांना दिसत नाही. म्हणून मला या डांगी लोकसाहित्याच्या माध्यमातून डांगी बोलीचा अभ्यास करणे महत्त्वाचे वाटते.

२) माझे आजोळ आणि बालपण डांग जिल्ह्यातील असल्याने डांगी आदिवासींशी आलेला सबंध व परिचय मला 'डांगी लोकसाहित्य आणि संस्कृती' या विषयाकडे अधिक चिकित्सकपणे पाहायला लावतो. येथील सण-उत्सव, रिती-भाती, खाण-पाण, राहणीमान, नाते सबंध, पोषाख, दाग दागिने, शिकार, वन्य प्राणी, दैनंदिन व्यवहार, बोली भाषा आणि एकूणच डांगी आदिवासी जीवनाचा स्वानुभव घेत असल्याने त्यातील वाटणारी रुची या अभ्यासास सहाय्यक झाली आहे.

३) "लोकसाहित्याच्या मूळ वारसदारांचा शोध घेतांना भिल्ल, कोरकू, ठाकर, कोलाम, माडिया, गोंड, आंध, नागा, वारली त्याचबरोबर कोकणा इत्यादी जमातीतील पारंपरिक जीवन जगणारे लोक हेच लोकसाहित्याचे खरे वारसदार आहेत"[४] असे म्हटले जाते. वरीलपैकी मीही कोकणा या जमातीचा आहे. त्याचाच एक अंश म्हणून हा अभ्यास करणे महत्त्वाचे वाटते.

४) डांगी आदिवासी जनता ही गरीब, अशिक्षित असल्याने समाजातील मुख्य प्रवाहापासून दूर राहिल्याचे दिसून येते. त्यांनी त्यांची आगळी वेगळी अशी संस्कृती आजतागायत टिकवून ठेवली आहे. परंतु ती तशीच टिकून राहील याची काही शाश्वती दिसत नाही. अशा मौलिक संस्कृतीला अक्षरबद्ध करून टिकवून ठेवणे आणि समाजातील मुख्य प्रवाहात आणणे अशी यामागची माझी भूमिका आहे.

५) लोकसाहित्याचा ठेवा प्रामुख्याने ग्रामीण भागातील किंवा डोंगर कपारीतील आदिवासींकडे पाहायला मिळतो. परंतु आदिवासी सांगितले की तो मागासलेला, गावंढळ, गलीच्छ,

अशिक्षित, असंस्कृत, अविचारी, अजाण, काहीही येत नसलेला अशा कितीतरी दृष्टींनी त्याकडे पाहिले जाते. यातील काही गोष्टी काही अंशी खऱ्याही असतील परंतु बारकाईने विचार केला तर त्याकडे जे अप्रतिम, मौल्यवान असे जे लोकसाहित्याचे धन आहे ते इतर पुढारलेल्या लोकांकडे मिळणे शक्य नाही. म्हणून मी या तळागाळातील आदिवासींपर्यंत पोहोचून त्यांच्याकडील लोकसाहित्याचे धन उकलण्याचा प्रयत्न करून ते नव्या पिढीपर्यंत घेऊन जाण्याचा प्रयत्न केलेला आहे.

### १. अ. ५. संशोधनाची ध्येय व उद्दिष्टे:

१) मौखिक असलेल्या डांगी लोकसाहित्याला अक्षरबद्ध करणे.

२) डांगी लोकसाहित्यातून प्रकट होणारी संस्कृती व इतिहास यांचा अभ्यास करणे.

३) भाषाशास्त्र व समाजशास्त्राच्या अभ्यासाला पूरक सामग्री म्हणून डांगी लोकसाहित्याचे संकलन व संपादन करणे.

४) डांगच्या इतिहासात जमा होणाऱ्या या अमूल्य डांगी लोकसाहित्याची दखल घेऊन त्यांना चिरकालित्त्व देणे गरजेचे आहे.

५) लोकरंजनाच्या दृष्टीने डांगी लोकसाहित्य कुठल्याही बाबतीत मागे नाही, म्हणून लोकरंजनासाठी डांगी लोकसाहित्य उपलब्ध करून देणे.

६) डांगी लोकसाहित्याला समाजातील मुख्य प्रवाहात आणणे.

७) डांगी बोली ही गुजरातीची की मराठीची असा वाद पूर्वीपासून पाहायला मिळतो. तो वाद पडताळून पाहणे व डांगी बोलीचे स्थान निश्चित करणे.

### १. अ. ६. संशोधनाची व्याप्ती:

प्रस्तुत संशोधनामध्ये डांग जिल्ह्यातील लोककथा, लोकगीते, म्हणी, उखाणे-आहाणे, वाक्प्रचार, लोकप्रथा, लोकभ्रम, लोकश्रद्धा, लोकविद्या, लोकसमज, रूढी, परंपरा, इत्यादी मौखिक लोकसाहित्य प्रकारांचा सखोल अभ्यास केला गेला आहे. डांगी लोकसाहित्याच्या माध्यमातून डांगी बोलीचा भाषाशास्त्रीय अभ्यास केला गेला आहे. ही या संशोधनाची व्याप्ती असून खालीलप्रमाणे संशोधनाची मर्यादा निश्चित केली आहे.

**१. अ. ७. संशोधनाच्या मर्यादा:**

प्रस्तुत संशोधन अभ्यास हा सध्याच्या डांग जिल्ह्यापुरताच मर्यादित असून त्याच भौगोलिक क्षेत्रातील डांगी बोलीभाषेत प्रचलित असलेल्या मौखिक लोकसाहित्याचा अभ्यास येथे केला गेला आहे. या डांगी लोकसाहित्याच्या माध्यमातून डांगी बोलीचा भाषाशास्त्रीय अभ्यास केलेला आहे. मात्र येथे नागरी किंवा शहरी जनतेच्या लोकसाहित्याचा आणि बोलीचा विचार केलेला नाही. ही या संशोधन विषयाची मर्यादा निश्चित केली आहे.

**१. अ. ८. संशोधनपूर्व संशोधन: एक पाहणी:**

'डांगी लोकसाहित्य आणि संस्कृती' या विषयावर अजूनपर्यंत मराठी भाषेत कोणीही सखोल अभ्यास केलेला नाही. म्हणून मी प्रथमच या विषयावर संशोधन करण्याचा प्रयत्न केला आहे.

तत्पूर्वी डांगी लोकसाहित्याचा अभ्यास म्हणून गुजराती भाषेमध्ये डॉ. पुंडलिक सी. पवार यांनी 'डांगी लोकसाहित्य: एक अध्ययन' तर डॉ. प्रभुभाई आर. चौधरी यांनी 'डांगी लोकसाहित्य: एक अभ्यास' असा केला आहे. नाही म्हणायला 'महाराष्ट्र लोकसाहित्य माले'च्या चौथ्या भागात इ. स. १९६० साली म्हणजे आज जवळ जवळ ६० वर्षापूर्वी डॉ. नरेश कवडी, कुसुम तपस्वी आणि सौ. विमल मोहिले यांनी अनुक्रमे 'डांग आणि डांगी लोकसाहित्य','डांगी गाणी' आणि 'डांगमधील आदिवासींची लोकगीते' या शीर्षकांखाली एक एक छोटेखानी लेख लिहिलेले दिसतात.[५]

डांगी बोलीचा विचार करता प्रथम विचार करावा लागतो तो ग्रिअर्सन यांचा. त्यांनी 'Linguistic Survey of India' च्या अकरा खंडांपैकी नवव्या खंडाच्या तिसऱ्या भागात डांगी बोलीचा अभ्यास करून ती खानदेशी बोलीला जवळ जाणारी असून खानदेशी बोली ही गुजरातीची एक बोली असल्याचे सांगितले. 'Tribes of South Gujarat' या नावाने १९४५ च्या सुमारास डॉ. दत्तात्रय पुरुषोत्तम खानापूरकर यांनी पीएच. डी. पदवीसाठी प्रबंध सादर केल्याचे दुर्गा भागवत त्यांच्या 'डांगच्या लोककथा-भाग १' मध्ये सांगतात. हा प्रबंध प्रकाशित झाला नसून त्याबद्दल विशेष माहिती मिळत नाही. त्यानंतर डॉ. नरेश कवडी यांनी 'Folk-Songs from Dang: A Linguistic Study' या शीर्षकाखाली १९५४ साली पुणे विद्यापीठाला एक प्रबंध सादर केल्याचे सापडते. त्यानंतर डॉ. सु. बा. कुलकर्णी यांनी 'Bhilli of Dangs' या प्रबंधाच्या माध्यमातून डांगमधील भिल्ल या जमातीला नजरेसमोर ठेऊन त्यांच्या बोलीचा अभ्यास केला आहे. परंतु हे चारही प्रबंध इंग्रजी भाषेतून लिहिले गेले आहेत हे ध्यानात घ्यावे लागते. शिवाय ते लोकसाहित्याशी परिपूर्ण सबंधित नाहीत.

माझा विषय 'डांगी लोकसाहित्य आणि संस्कृती: एक अभ्यास' असा आहे. तो उपरोक्त संशोधकांनी केलेल्या अभ्यासापेक्षा वेगळा आहे.

**१. अ. ९. संशोधनाची कार्यपद्धती व तंत्रे:**

१) संशोधन क्षेत्राची पाहणी व सीमा निश्चित करणे.

२) संशोधन क्षेत्रातील डांगी लोकसाहित्याचे संकलन करणे.

३) संकलनातील अडचणींची नोंद घेणे व त्या अडचणी दूर करणे.

४) डांगी लोकसाहित्याचे वर्गीकरण व विश्लेषण करणे.

५) अभ्यासांती निष्कर्षांची मांडणी करणे.

**१. अ. १०. गृहीतके:**

१) डांगची आदिवासी प्रजा गरीब व अशिक्षित असल्याने त्यांचा विकास झाला नाही, पर्यायाने तेप्रसारमाध्यमांपासून दूर राहिले.

२) डांगी आदिवासींचा स्वातंत्र्योत्तर काळात अधिक विकास झाला.

३) डांगी संस्कृती इतर संस्कृतींपेक्षा वेगळी आहे.

४) डांगच्या सीमा प्रदेशातील मराठी आणि गुजराती भाषांचा प्रभाव डांगी बोलीवर जाणवतो.

५) डांगी बोलीत प्रमाण मराठीपेक्षा आणि प्रमाण गुजरातीपेक्षा वेगळेपणा आढळून येतो.

## ब) डांग: भौगोलिक परिसर

### १. ब. १. प्रस्तावना:

डांगच्या भौगोलिक परिसराचा विचार करता आपणास असे लक्षात येते की, डांग म्हणजे मुळात जंगल किंवा जंगलयुक्त परिसर. अशा जंगलाने दाट असलेला हा परिसर साहजिकच अनेक डोंगर टेकड्यांनी भरलेला आहे. येथील जंगलात अनेक वनौषधी आहेत. त्याचा पुरेपूर उपयोग येथील आदिवासी करताना दिसतो.

डांगमध्ये ज्या प्रमुख सहा नद्या आहेत, त्या सह्याद्रीच्या डोंगर रांगेतूनच उगम पावतात. त्या पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहत जातात. ह्या नद्या ज्या सह्याद्रीच्या डोंगर रांगेतून उगम पावतात त्या डोंगर रांगेच्या एका बाजूला महाराष्ट्र राज्याची सीमा तर दुसऱ्या बाजूला गुजरात राज्याची सीमा पाहायला मिळते. या नद्या डांगच्या आदिवासींसाठी खूप महत्त्वाच्या आहेत. येथील हवामान उष्णदमट स्वरूपाचे आढळते. त्यामुळे उन्हाळ्यात खूप उष्णता असते. जंगलाचे प्रमाण खूप असले तरी या जंगलातील झाडांची पाने उन्हाळ्यात गळून पडलेली असतात. अशा वेळी रखरखत्या उन्हात हे आदिवासी नदीकाठी पाणवठ्याचा आधार शोधतात.

प्रस्तुत प्रकरणाच्या ब) भागात डांग शब्दाचा अर्थ, भौगोलिक परिचय, धार्मिक जीवनाचा परिचय, सामाजिक जीवनाचा परिचय, डांग जिल्ह्याचा राजकीय इतिहास आणि शैक्षणिक परिचय यांचा सखोल विचार केला असून त्यांच्या उपघटकांचाही विचार केला आहे.

### १. ब. २. डांग शब्दाचा अर्थ:

- भारतीय संस्कृती कोशामध्ये ‘डांग’ या शब्दाचा अर्थ डोंगराळ भाग किंवा दाट जंगल असा दिला आहे.[६]
- डॉ. पुंडलिक सी. पवार हे आपल्या ग्रंथामध्ये म्हणतात, ‘डांग’ म्हणजेच जंगल (दंडकारण्य), डोंगराळ भाग. डांगचा दुसरा अर्थ आहे बांबू. हे डांग जिल्ह्याचे मुख्य उत्पादनही आहे.[७]
- तर दंडकारण्य म्हणजे नेमके काय हे जाणून घेण्यासाठी स. ध. झांबरे यांच्या शब्दकोशाकडे पाहता, दंडकारण्य म्हणजे नर्मदा व गोदावरी या दोन नद्यांच्यामधील अरण्यमय प्रदेश.[८]
- ‘डांग’ हा जंगल किंवा अरण्य या अर्थी येणाऱ्या ‘दांग’ या शब्दाचा अपभ्रंश असावा अशी व्युत्पत्ती प्रा. कृ. पा. कुलकर्णी देतात.
- ‘अनमोल मराठी शब्दरत्नाकर’ या वा.गो. आपटे यांच्या शब्दकोशात ‘डांग’ शब्दाचा अर्थ ‘टेकडीचे शिखर’ असा दिला आहे.[९]
- मराठी विश्वकोशामध्ये ‘डांग’ शब्दाचा अर्थ ‘डोंगरमाथा’ असा आहे.[१०]

वरील वेगवेगळ्या ग्रंथविवेचनाच्या आधारे असे म्हणता येते की, डांग म्हणजे जंगलयुक्त प्रदेश, डांग म्हणजे डोंगर टेकड्यांचा प्रदेश, डांग म्हणजे गिरी-माळांचा प्रदेश होय. तर डॉ. पुंडलिक पवार यांच्या ग्रंथाच्या आधारे असे म्हणता येते की, डांग म्हणजे बांबू किंवा बांबूंनी भरलेला प्रदेश.

त्यांच्या विवेचनात थोडे तथ्य जाणवते ते यासाठी की, आजही आपण डांगच्या कोणत्याही भागात प्रवेश केला तरी आपल्याला बांबूची झाडे हमखास पाहायला मिळतील. थोडक्यात बांबूची झाडे या जंगलात खूप आहेत. पुढे ते म्हणतात की, बांबू हे डांग जिल्ह्याचे मुख्य उत्पादनही आहे. त्याचे कारण असे की, येथील आदिवासी या बांबूंपासून वेगवेगळ्या जीवनावश्यक वस्तू तयार करून त्याचा आपल्या जीवनात उपयोग करतात. त्यामध्ये सूप, दुरडी/डालखी/टोपली, मळी, भोत, कटवा, झिला, भोवाळी/कणगी, घराला भींत म्हणून कुड/खपाडा, एवढेच नव्हे तर बांबू कोवळे असताना त्याचे सेवनही केले जाते. यावरून डॉ. पुंडलिक पवार यांचे म्हणणे रास्त वाटते.

“साकेत मराठी-मराठी शब्दकोश” या स. ध. झांबरे यांच्या शब्दकोशाकडे पाहता त्यांनी “डांग” या शब्दाचा व्यापक अर्थ दिलेला आहे. ते म्हणतात की, दंडकारण्य (डांग) म्हणजे नर्मदा व गोदावरी या दोन नद्यांच्यामधील अरण्यमय प्रदेश. हा विचार अतिव्यापक असला तरी त्यातील ‘अरण्य’ हा शब्द महत्त्वाचा आहे. नर्मदा आणि गोदावरी यांच्या दरम्यान जो अरण्यमय प्रदेश येतो तो म्हणजे आजचा हा डांगच.

### १. ब. ३. भौगोलिक परिचय:

यामध्ये भौगोलिक स्थान, चतु:सीमा, हवामान व पिके, डांगमधील नद्या इत्यादी घटकांच्या अंगाने परिचय करून देण्यात आला आहे.

#### *१. ब. ३. १. भौगोलिक स्थान:*

डांग जिल्ह्याच्या भौगोलिक स्थानाचा विचार करता तो महाराष्ट्र राज्याच्या उत्तरेला आणि गुजरात राज्याच्या दक्षिणेला असलेला एक छोटासा जिल्हा आहे. तो प्रशासनाच्या सोयीसाठी इंग्रज काळात आणि त्यानंतरही कधी सुरतला जोडला गेला तर कधी नाशिकला जोडला गेला. म्हणजेच तो कधी गुजरातमध्ये सामील झाला तर कधी महाराष्ट्रात सामील झाला. असे असले तरी तो आज गुजरातमध्ये स्थित आहे ही वस्तुस्थिती आहे.

डांग जिल्ह्याचा एकूण विस्तार २०°, ३०°, ४०° उत्तर अक्षांशवृत्त आणि ७३°, ५६°, ३६° पूर्व रेखांशवृत्तामध्ये सामावलेला आहे.[११] तसेच क्षेत्रफळाच्या दृष्टीने विचार करता त्याचे एकूण क्षेत्रफळ हे १७६८ चौ.किमी. इतके आहे. डांगची दक्षिणोत्तर लांबी ५९ किमी. तर पूर्व-पश्चिम लांबी ५० किमी. आहे.[१२] उंची समुद्रसपाटीपासून सुमारे ५०० ते ६०० मी. असून आग्नेय भागात ती ६०० मी. पेक्षाही अधिक आहे. हा सह्याद्रीचा उत्तर भाग आहे.[१३]

#### *१. ब. ३. २. चतु:सीमा:*

डांगच्या उत्तरेला तापी जिल्ह्यातील (पूर्वीचा सुरत जिल्हा) व्यारा, सोनगढ तालुका आणि धुळे जिल्ह्यातील नवापूर तालुका येतो. पूर्वेला धुळे जिल्ह्यातील साक्री आणि नाशिक जिल्ह्यातील बागलाण (सटाणा) आणि कळवण तालुका, दक्षिणेला नाशिक जिल्ह्यातील कळवण आणि सुरगाणा तालुका, तर पश्चिमेला नवसारी जिल्ह्यातील वासदा तालुका येतो.[१४]

वरील डांग जिल्ह्याच्या सीमा निश्चित असल्या तरी १ मे १९६० पूर्वी म्हणजेच गुजरात आणि महाराष्ट्राची विभागणी होण्यापूर्वी डांगच्या सीमा खूप विस्तारित होत्या. त्यात सध्याच्या नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा तालुक्यातील काही भाग, नवसारी जिल्ह्यातील वासदा तालुक्यातील काही भाग तर वलसाड जिल्ह्यातील धरमपूर तालुक्यातील काही भाग हा डांगमध्ये मोडत होता. याचा पुरावा म्हणून आजही ह्या तीनही तालुक्यांत आपणास डांगी बोलीभाषा बोलणारे स्थानिक आदिवासी पहावयास मिळतात. परंतु प्रशासनाच्या सोयीसाठी १ मे १९६० रोजी पासून डांग जिल्ह्याच्या उपर्निर्दिष्ट सीमा निश्चित केल्या आहेत.

*१. ब. ३. ३. हवामान व पिके:*

डांगमधील हवामान उष्ण, दमट व काहीसे विषम स्वरूपाचे असून सापुतारा हे गुजरात राज्यातील एक सुप्रसिद्ध थंड हवेचे ठिकाणही पाहायला मिळते. येथे उन्हाळ्यात पर्यटकांची मोठी गर्दी उसळते. डोंगराळ भागामुळे पावसाचे प्रमाण १५० सेंमी.हून अधिक आढळते. आग्नेय भागात पाऊस त्याहीपेक्षा जास्त पडतो.[१५] येथील तळखडक मुख्यतः बेसाल्ट आणि अग्निजन्य खडकापासून बनलेला असून भूस्वरूप डोंगराळ आहे व येथे काळी आणि लाल माती आढळते.

चढउतारांनी युक्त असा हा भूप्रदेश असल्याने येथे शेतीही चढउतारावरच केली जाते. त्यामुळे खरीप पिकांचा समावेश जास्त आहे. पावसाचे प्रमाण योग्य असले तरी मोठी धरणे कोठेही दिसत नाहीत, त्यामुळे पावसाचे पाणी अडवले जात नाही परिणामी रब्बी पिकांचे प्रमाण कमी आहे. डांगच्या प्रमुख पिकांमध्ये भात, नाचणी/नागली, वरई, तूर, उडीद, भुईमुग, खुरसणी इत्यादींचा समावेश होतो.

ही सगळी पिके खरीप हंगामाची असल्यामुळे ती पुर्णतः पावसावर अवलंबून असतात. प्रत्येक वेळेस पाऊस पडतोच असे नाही आणि पडलाच तर तोही वेळेवर पडेलच याची शाश्वती नसते. अशा वेळी ही पिके अतिपावसाने एकतर नासली जातात किंवा कमी पावसामुळे येत नाहीत. अशावेळी येथील आदिवासींचे खूप हाल होतात. याला पर्याय म्हणून काही आदिवासी आजूबाजूच्या परिसरात काम शोधतात तर काही घाटावर म्हणजेच नाशिक जिल्ह्यातील निफाड-दिंडोरी तालुक्यात बाजरीच्या सोंगणीसाठी किंवा द्राक्षाच्या तोडणीसाठी जातात. यातून मिळालेले थोडेफार पैसे ते आपल्या घरखर्चासाठी वापरतात. असे तुटपुंजे धान्य, पैसा असला तरी ते आपल्या निजी जीवनात समाधानी आहेत.

*१. ब. ३. ४. डांगमधील नद्या:*

डांग जिल्ह्यात एकूण सहा प्रमुख नद्या आहेत. त्या पूर्णा, अंबिका, खापरी, गिरा, धोधड, आणि सर्पगंगा[१६] या नावाने ओळखल्या जातात. ह्या सर्व नद्या सह्याद्रीच्या पर्वत रांगेतून किंवा सापुतारा या डोंगर रांगेतून उगम पावून पुढे अरबी समुद्राला मिळतात. ह्या नद्या पूर्वेला उगम पावून पश्चिमेला वाहत जातात. याशिवाय इतरही लहान मोठ्या नद्या-नाले आहेत. ह्या नद्या पावसाळ्यात भरभरून वाहतात मात्र उन्हाळ्यात कोरड्या होऊन पडतात. असे असले तरी ह्या नद्या डांगी आदिवासींसाठी खूप महत्त्वाच्या आहेत. यातील अंबिका नदीवर वघई जवळ 'गिरा धोद' नावाचा एक धबधबा प्रसिद्ध आहे. डांगमधील दुसरा धबधबाही 'गिरा धोद' नावानेच प्रसिद्ध आहे. हा धबधबा 'गिरा' नावाच्या

नदीवर असून तो गिरमाळ गावाजवळ आहे. त्यामुळे त्याला गिरमाळ धबधबा नावानेही ओळखले जाते. येथे पावसाळ्यात आणि हिवाळ्यातही काही दिवस पर्यटकांची गर्दी पाहायला मिळते.

ह्या नद्या पावसाळ्यात दुथडी वाहतात, ते पाहताना माणसाच्या अंगावर अक्षरशः काटा उभा राहतो. तसेच भीतीयुक्त आनंदही होतो. कारण पावसाळ्यात ह्या नद्यांनी रौद्र रूप धारण केले असले तरी त्या पाहताना तेवढाच आनंदही होतो.

पावसाचे पाणी कमी होताच निसर्गही आपले एकेक रूप दाखवायला सुरुवात करतो. एकीकडे येथील आदिवासींचे भात, नाचणी, वरई इत्यादींच्या लावणीचे दिवस असतात तर दुसरीकडे निसर्गानेही आपले रूप बदललेले असते. चहुकडे हिरवळ पसरलेली असते, उंचच उंच झाडे पाहायला मिळतात तर कुठे मधूनच एखादा डोंगरावरून खळखळणारा झरा पाहायला मिळतो. हे एकूणच दृश्य मनमोहक असते.

डांगी आदिवासी ह्या नद्यांचा मोठ्या खुबीने उपयोग करून घेतात. ते या नद्यांतील मासे, खेकडे आणि झिंग्यांसारख्यांची शिकार करून आपला उदरनिर्वाह करतात. यासाठी ते वेगवेगळ्या साधन सामुग्रीचा वापर करतात. मासे, खेकडे आणि झिंगे पकडण्यासाठी बांबूपासून तयार केलेल्या मळी, भोत, ताटुक, कटवा इत्यादींचा वापर करतात. तर कधी नदीतला एखादा उथळ भाग बघून म्हणजेच ज्यामध्ये मासे, खेकडे आणि झिंगे जास्त मिळतील शिवाय त्यातील पाणी काढून टाकायला सोपे जाईल असा भाग बघून त्या भागाला चहुबाजूने दगड, सागाची पाने आणि चिखल-माती इत्यादींच्या साहाय्याने बांधून घेऊन जेणेकरून आतील भागात बाहेरचे पाणी येऊ नये अशी व्यवस्था करून आतील पाणी ताट-वाटीच्या साहाय्याने किंवा हाताने उपसून बाहेर काढले जाते. आणि मग आपोआपच पाणी आटले की त्यातील मासे, खेकडे आणि झिंगे पकडायला सोपे जाते. हे करत असताना मात्र साधारणतः पाच ते दहा लोकांचा समूह असतो. त्यात लहानांपासून ते वृद्धांपर्यंत सगळ्यांचाच सहभाग असतो. तसेच काही स्त्रिया घरातील एक-दोन ताटं घेऊन त्यात वाळू आणि छोटे छोटे तीन चार दगड घेऊन ते नदीच्या पात्रात बुडवून ठेवतात व चार पाच मिनिटांनी त्याच्या भोवती एक फेरा घालून ते ताटं अलगद हालचाल न करता उचलले जातात. आता त्यात आपल्याला ‘मळ मासा’ आणि ‘मुरु’ नावाचा छोटा मासा बघायला मिळेल. या सर्व प्रक्रियेला ह्या स्त्रिया ‘‘थाळी पुरणे’’ असा शब्द वापरतात. अशा वेगवेगळ्या पद्धतींनी वेगवेगळी साधने वापरून हे आदिवासी नदीतील मासे, खेकडे आणि झिंग्यांची शिकार करतात.

तसेच स्वतः बरोबर रेड्यांची अंघोळही ते या नदीमध्येच करतात. नद्यांच्या काठाला पाणी पिण्यासाठी ठिकठिकाणी झिरे केलेले आढळतात. त्याचप्रमाणे कपडे धुणे वगैरेंसाठी ह्या नद्या डांगी आदिवासींसाठी अतिशय महत्त्वाच्या आहेत. या नद्या त्यांच्या जीवनाचा एक अभिन्न भाग आहेत.

### **१. ब. ४. धार्मिक जीवनाचा परिचय:**

#### *१. ब. ४. १. शबरीधाम:*

‘‘पितृ आज्ञा पाळण्यासाठी राम वनवासात गेले होते. वनवासानिमित्त दंडकारण्यातील पंचवटीत निवास असतांना रावणाने सीतेचे अपहरण केले. सीतेच्या शोधात निघालेले श्रीराम-लक्ष्मण

एक दिवस शबरीच्या झोपडीत पोहोचले ते स्थान म्हणजे आजचे शबरीधाम हे होय. याठिकाणी सध्या श्रीराम, लक्ष्मण आणि शबरीची मूर्ती असलेले भव्य मंदिर उभारण्यात आले आहे. याचा पुरावा म्हणून येथे शबरीवन आणि सुबीर हे गाव पाहायला मिळते. शबरीधाम हे आहव्यापासून ३५ किमी. अंतरावर सुबीर गावाजवळ आहे."[१७]

त्रेता युगातील ही घटना असून श्रीराम आणि लक्ष्मण यांना ज्या शिळांवर बसवून शबरीमातेने बोरे खायला दिली होती, त्या शिळाही याच मंदिरात श्रीराम, लक्ष्मण आणि शबरीमातेच्या मूर्तींच्या पायथ्याशी पाहायला मिळतात. श्रीरामाचे दर्शन घेऊन धन्य झालेल्या शबरीमातेने स्वतःला योगाग्निद्वारा संपवून घेतले. ह्या योगाग्निचा जो प्रकाश पडला ती जागा आजही "चमक डोंगर" या नावाने प्रसिद्ध आहे.

शबरीमातेने गुरु मातंग ऋषी यांच्या गुरुवचनाचे पालन करत, श्रीराम नामाचे जप करत, स्मरण करत अखंड आयुष्य कंठले त्या शबरीमातेच्या झोपडीत शेवटी एक दिवस प्रत्यक्ष परमेश्वर अवतरले. अशाच श्रद्धेने आजही भाविक मोठ्या संख्येने या स्थळाला भेटी देवून आपल्या मनोकामना पूर्ण करतात.

*१. ब. ४. २. पंपा सरोवर:*

"शबरीधामपासून ६ किमी. दूर असणारे हे स्थान म्हणजेच शबरीकुंभाचे स्थान होय. रामायणामध्ये पंपा सरोवर पुष्करिणी नदीच्या किनाऱ्यावर आहे असा उल्लेख येतो. येथे पूर्णा नदीचा प्रवाह आहे. कदाचित हिलाच प्राचीन काळात 'पुष्करिणी' नावाने ओळखले जात असावे असे वाटते. तसेच पंपा सरोवराच्या किनाऱ्यावर असंख्य सुगंधित पुष्प आहेत. रामायणामध्येही करंज पुष्पाचे वर्णन आहे. पंपा सरोवराजवळील 'करंजडा' गावाचे नाव कदाचित या करंज पुष्पांमुळेच पडले असावे. शबरी मातेचे गुरु मातंग ऋषींचा आश्रमही जिथे होता असा 'मातंग पर्वत' पंपा सरोवराच्या जवळच आहे."[१८]

आज जो पंपा सरोवर आहे त्याच्याच ठीक वरच्या बाजूला पाणी अडवण्यासाठी एक छोटासा सिमेंटी बंधारा/बांध घातला आहे. या बंधाऱ्यामुळे सरोवराला अधिकच शोभा आली आहे. हे स्थान शबरीधामपासून ६ किमी. आडरानात असले तरी आणि तिथे जाण्यासाठी फक्त एक वाहन जाईल इतकाच रस्ता असला तरी तेथील निसर्गसौंदर्य पाहण्यासाठी पर्यटकांची मोठी गर्दी असते. असे सांगतात की उन्हाळ्यात बारा कोसांपर्यंत या भागात पाणी नसते ते या पंपा सरोवरात असते. हे सरोवर कधीही कोरडे होत नाही. म्हणून शबरीमाता येथे पाण्यासाठी येत असे. आजही शबरीधामला येथूनच पाणी नेले आहे.

*१. ब. ४. ३. अंजन कुंड:*

"आहव्यापासून अवघ्या २५ किमी. पूर्वेला असलेल्या डोंगराळ भागात हे कुंड आहे. पवनपुत्र हनुमानाच्या आईच्या नावाने हे कुंड प्रसिद्ध आहे. अंजनीदेवीने या कुंडात स्नान केले होते. अशी एक लोक आख्यायिका आहे."[१९]

तसेच अंजन कुंड येथे हनुमानाची आणि त्याच्या आईची म्हणजेच अंजनीमातेची मूर्ती असलेले एक भव्य मंदिर पूर्वेकडे तोंड करून उभे आहे आणि त्या मुर्तींच्याच पायथ्याशी एक ते दीड फुटाचा एक छोटासा दगड आहे. त्या दगडावर साधारणतः ३ ते ४ इंच इतकी छोटी मानवी पावले उमटलेली आहेत. ही पावले साधारणतः एक वर्ष वयाच्या बाळाच्या पावलाइतकी छोटी आहेत. त्यांना सध्या शेंदूर, कुंकवाने रंगवून दिले आहे. एखाद्या ठिकाणी मातीवर काडीने रेघोट्या मारून मानवी पावले उमटवावी तशी ती उमटवलेली दिसतात. ती पौराणिक काळातील असावीत असे पाहताक्षणी तरी वाटत नाही. पण या मताला येथील पुजारी श्री. गोपाल पवार याने विरोध केला. त्याच्या मतानुसार ही पावले खूप जुनी असून ती पौराणिक काळातील हनुमानाची आहेत.

तसेच पुजारी श्री. गोपाल पवार यांनी असेही सांगितले की, "अंजनी मातेने हनुमानाला याच ठिकाणी जन्म दिला." हे सांगत असताना त्याचा पुरावा म्हणून येथे असलेल्या खडकावर स्त्री आकृतीचा खड्डा किंवा चार आहे, त्याकडे बोट दाखवले. हा खड्डा किंवा चार दिसायला एका अवाढव्य स्त्रीसारखा दिसतो. हा खड्डा नाल्याच्या मधोमध असल्याने पावसाळ्यात त्यातूनच नाल्याचं पाणी वाहते. ही खडकावर उमटलेली स्त्री आकृती उत्तरेकडे तोंड करून आडवी पडलेली आहे असे दिसते. तिची लांबी मोजल्यास डोक्याचा भाग ६ फुट ४ इंच, मानेचा भाग ३ फुट ८ इंच, मानेपासून तर कमरेपर्यंतचा पोटाचा भाग १४ फुट आणि कमरेपासून खाली पायापर्यंत साधारणतः ६४ फुट ('साधारणतः' हा शब्द यासाठी वापरला की, कमरेपासून खाली पायापर्यंतचा भाग नीट मोजता येत नाही. याचे कारण असे की पाय कुठे सुरु होतात आणि कुठे संपतात हेच कळत नाही. शिवाय पायाचा काही भाग अगदी कुंडाच्या पाण्यापर्यंत जातो म्हणून नेमके कुठेपर्यंत मोजावे हे कळत नाही.) आहे. याप्रमाणे ही खडकावरील स्त्री आकृती साधारणतः ८८ फुट लांबीची आहे. तर रुंदीचा विचार करता ती डोक्याकडे ३.५ फुट, मानेकडे २.५ फुट, पोटाचा भाग ७.५ फुट, कमरेचा भाग २ फुट, आणि पायांचा भाग ४ फुट आहे. येथे मात्र रुंदीचा भाग नीट मोजता येत नाही. कारण वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळे आकार पाहायला मिळतात. असे असले तरी योग्य ती रुंदी देण्याचा प्रयत्न केला आहे. या स्त्री आकृतीच्या डोक्याच्या वरील भागात पाणी अडवण्यासाठी एक छोटासा सिमेंटी बंधारा बांधला आहे. त्यामुळे तेथील बराचसा भाग रेतीने बुजला गेला आहे. याच कारणास्तव रेतीखालील मूळ खडकाचा भाग बुजला गेला आहे. त्या बुजल्या गेलेल्या खडकावरही काही निशाणी अस्तित्त्वात होत्या पण बंधाऱ्यामुळे त्या आज पाहायला मिळत नाहीत.

अंजन कुंड येथे ज्या दगडावर बाल हनुमानाची पावले उमटलेली आहेत त्याच दगडावर अंजनी माता बाल हनुमानाला बसवून अंघोळ घालायची अशी एक लोक आख्यायिका आहे. आज जी खडकावर उमटलेली स्त्री आकृती दिसते ती अंजना माता प्रसूत झाल्याची खुन आहे असे सांगितले जाते. येथून पूर्वेकडे १ किमी. अंतरावर डोंगराकडे एक गुहा असून ती सध्या खूपच जीर्णावस्थेत आहे. त्यामध्ये सध्या एक शिवलिंग आहे पण ती आता आताच कोणीतरी ठेवली असावी असे दिसते. येथील काही वृद्ध लोक सांगतात की, याच गुहेत अंजनी माताने १२ वर्षे शिवाची तपश्चर्या केली आणि शिवाकडून त्यालाच स्वतःच्या पोटी येण्याचा वर मागून घेवून ती याच ठिकाणी प्रसूत झाली. ही गुफा किंवा गुहा म्हणजे तीचे घरच होते. ती आज 'अंजनी गुफा' म्हणून प्रसिद्ध आहे.

येथे असलेल्या अताळा डोंगरावर आजही हनुमानाचं निवास आहे. काही अमावस्येला किंवा पौर्णिमेला रात्री एक ते दीडच्या दरम्यान येथील हनुमान निघून सप्तशृंगी गडावर देवीच्या दर्शनासाठी जातो. ज्या व्यक्तीच्या मनात श्रद्धा असेल अशा व्यक्तीला हनुमानाचे आजही दर्शन होते. पुजाऱ्याच्या म्हणण्यानुसार तो हेलीकॉप्टरसारखा उडून जातो. या अताळा डोंगरावर काही अनमोल वनस्पतीही मिळतात. त्या वनस्पती रात्रीच्या वेळेला प्रकाशमय होतात/पेटतात. अशावेळी एक दोन जनांनी जावून त्या वनस्पतींना कच्चे धागे बांधून यावे आणि सकाळ झाल्यावर त्या वनस्पती घ्यायला जावे.

हनुमान जयंतीला येथे मोठी यात्रा भरते. वेगवेगळे सांस्कृतिक कार्यक्रम होतात. मिरवणूक निघते. भजन-कीर्तन होते. एकूणच ह्या दिवशी वातावरण भक्तिमय, आनंददायी होऊन जाते. सगळीकडे रंगीबेरंगी पताका फडकताना दिसतात आणि 'अंजना माता की जय', 'भगवान हनुमान की जय' असा नाद सगळीकडे पसरलेला दिसतो.

हे सगळं ऐकून झाल्यानंतर मी माझ्या मनातील प्रश्न त्या पुजाऱ्याला विचारला की, मी ऐकून असल्याप्रमाणे हनुमानाचा जन्म नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वरच्या जवळ असलेल्या अंजनेरी किल्ल्यावर झाला आणि हे सर्वश्रुत आहे. मात्र हे त्या पुजाऱ्याला माहीत नव्हते तरीही त्याने माझ्या मताला छेद देत हनुमान जन्माची हीच मूळ जागा आहे असे सांगितले. हे सांगत असताना आमच्या पूर्वजांपासून सांगत आले आहेत की हीच हनुमान जन्माची जागा आहे. या गावाचेही नाव 'अंजन कुंड' असे याच जागेवरून पडले आहे. तसेच समोरील डोंगर रांगेलाही 'अंजनी डोंगर माळा' असे काही लोक म्हणतात.

वरील सर्व विवेचन ऐकून आणि नोंदून घेतल्यानंतर मी नाशिक जिल्ह्यातील अंजनेरीला गेलो. तिथे गेल्यानंतर मला अशोक बाबा उर्फ ब्रह्मगिरी बाबा महंत हे भेटले. त्यांनी बोलण्याच्या ओघात बरीच माहिती मला पुरविली. त्यातील काही महत्त्वाच्या नोंदी मी येथे उधृत करणार आहे. येथेही अंजनी पर्वत पाहायला मिळतो. त्याला अंजनेरी किल्ला, अंजनेरी गड, अंजनी माता तपोभूमी, ऋषीमुख पर्वत अशा वेगवेगळ्या नावांनी ओळखले जाते. येथेही हनुमान आणि अंजनी मातेच्या मूर्ती असलेले एक छोटेसे मंदिर आहे. परंतु हे मंदिर डोंगराच्या शेवटच्या टोकाला आहे. पायथ्यापासून हे अंतर ६ किमी. इतके आहे. पायथ्यापासून वेगवेगळ्या गुहा पाहायला मिळतात. ह्या मंदिरात हनुमान आणि अंजनी मातेच्या मूर्तींच्या समोरच दोन गोलाकार लहान मोठे दगडी गोटे आहेत. त्यातील छोटा गोटा हा हनुमानाचा प्रतिक तर मोठा गोटा हा अंजनी मातेचा प्रतिक समजला जातो. हे दोन्ही गोटे शेंदूर लावून रंगवून दिले आहेत. ह्या गोट्यांच्याच बाजूला हनुमानाचं प्रतिक असलेली एक छोटी गदा ठेवली आहे. बाहेरील बोर्डावर लिहिलंय की, "श्री क्षेत्र अंजनेरी गड, अंजनी माता मंदिर ॥ हनुमान जन्म स्थान, ऋषीमुख पर्वत ॥ यहा अंजनी माता ने १०८ साल तपस्या कि है।" यावरून हनुमानाचा जन्म येथे झाला असे दिसते आहे. याव्यतिरिक्त अजूनही काही खुणा हनुमान जन्माविषयी सांगितल्या जातात. जसे की येथे एक भलेमोठे तळे आहे जे हनुमान चरण तल, सूर्यकुंड किंवा इंद्रकुंड या नावाने प्रसिद्ध आहे. ह्या तळयाच्या उंच भागावर जावून बघितले असता ते मानवी चरणासारखे दिसते. येथील लोकं या तळयाला हनुमानाचं चरण मानतात. येथेच एका गोष्टीचा निर्देश करावासा वाटतो की, या दोन्ही ठिकाणांचा विचार करता दोन्ही ठिकाणी हनुमानाचे चरण दाखवले जाते. परंतु एका ठिकाणी ते

हाताच्या तळव्याएवढे आहे तर दुसऱ्या ठिकाणी तेच चरण तळयाच्या रूपाने पुष्कळच मोठे आहे. ही एवढी मोठी तफावत का? असा प्रश्न पडल्यावाचून राहत नाही. तसेच येथे एक लेणी आहे की ज्यामध्ये अंजनी मातेची मूर्ती आहे, हनुमानाची मूर्ती आहे, गणपतीची मूर्ती आहे, वानरांची मूर्ती आहे, श्रीराम लक्ष्मण यांची मूर्ती आहे आणि महत्त्वाचं म्हणजे ही लेणी पुरातनकालीन असावी. त्याच प्रमाणे रामायणामध्ये उल्लेखित किष्किंधानगरी याच डोंगराच्या पायथ्याच्या दुसऱ्या बाजूला आहे. जे आज कुशेगाव म्हणून ओळखले जाते. एकंदरीत येथेही अंजनी मातेविषयी आणि हनुमानाविषयी वेगवेगळ्या खाणाखुणा दाखवून खूप माहिती दिली जाते.

असे असले तरी या दोन्ही ठिकाणच्या पुजाऱ्यांना एकमेकांविषयी माहिती आहे असे दिसत नाही. हे दोन्हीही पुजारी हे पक्केपणी जाणून आहेत की, याव्यतिरिक्त दुसऱ्या ठिकाणी अंजनी मातेविषयी आणि हनुमान जन्माविषयी माहिती मिळत नाही. परंतु त्यांचा हा गैरसमज कोणीतरी संशोधकाने दूर करून नेमके हनुमान जन्मस्थान कोणते ते सिद्ध करावे. हा विषय खूप व्यापक असून यावर स्वतंत्र संशोधन होणे गरजेचे आहे.

*१. ब. ४. ४. पांडव गुफा:*

आहव्यापासून ३० किमी. अंतरावर असलेल्या पांडवा गावाजवळ 'पांडव गुफा' आजही जीर्ण अवस्थेत पाहायला मिळते. ही गुफा आजही महाभारतातील नायक 'पांडव' हे याठिकाणी येऊन राहिल्याचा पुरावा देते. शेजारील पांडवा गावाचे नावही याच पांडव गुफेवरून पडले असे सांगितले जाते. ही गुफा किंवा गुहा अताळाधाम या डोंगराच्या पायथ्याशी वायव्य भागात आहे. ही गुफा एका छोट्याशा नाल्यात मधोमध असूनसुद्धा नाल्याचे पाणी मात्र या गुफेत जात नाही हे येथील विशेष. ही गुफा एका उभ्या खडकाच्या मधोमध असल्यामुळे नाल्याचे पाणी गुफेच्या पुढे अलगद पडते आणि त्यामुळे गुफा पावसाळ्यातही कोरडीच राहते. हीच सोय पाहून कदाचित पांडवांनी ही जागा निवडली असावी. या गुफेत पूर्वी पाची पांडवांसाठी पाच खोल्या होत्या असे सांगितले जाते. त्यातील सर्वात मोठी खोली ही भिमासाठी होती. पण आता ह्या घडीला खोल्या वगैरे काहीही स्पष्टपणे दिसत नाहीत. नाही सांगायला या गुफेचे दोन भाग पडतात असे दिसते. ही गुफा बाहेरच्या बाजूला मोठी आहे आणि जसेजसे आत जावे तसेतसे तिचे आकार कमी कमी होत जाते. बाहेरच्या बाजूला हिची उंची साधारणतः ८ फुट पर्यंत आहे परंतु सर्वत्र सारखी उंची दिसत नाही. तसेच बाहेरून आत पर्यंतची लांबी साधारणतः ६० फुट आहे. यातील मोठी गुफा ८० फुटाची आहे तर लहान गुफा ही साधारणतः ५० फुटाची आहे. आत काही दगड मातीने कृत्रिम भिंती बांधल्या असून सर्वत्र कोरडी माती पसरलेली आहे. ही जागा पांडवांच्या पदस्पर्शाने पवित्र झाली असल्याने येथील मातीही लोकांनी किंवा भगतांनी औषध म्हणून वाहून नेली आहे.

येथे रात्री अपरात्री जाण्यास हिंस्र प्राण्यांचा धोका संभवू शकतो कारण हा भाग दाट जंगलात आला असून या जंगलात वाघ, बिबट्यासारखे हिंस्र पशुही पाहायला मिळतात. बिबट्याला येथील आदिवासी 'खड्या' या नावाने ओळखतात. या गुफेच्या आजूबाजूला वन विभागाने जंगली 'पशुंपासून सावधान' अशा अर्थाचे बोर्ड लावले आहेत. तसेच या ठिकाणाला डोंगऱ्या देवाच्या उत्सव प्रसंगी आजूबाजूच्या गावातील लोकं गउळ म्हणून उपयोग करतात.

तसेच पांडवांसंबंधी एक पुरावा असाही सांगतात की, डांगच्या सीमेवरील नाशिक जिल्ह्यातील मुल्हेरचा किल्ला पांडवांच्या काळी मयूरध्वज आणि ताम्रध्वज या नावांच्या भावांनी बांधला असे म्हणतात.[२०] आजचा मुल्हेर किल्ला डांगच्या सीमेवर असून तो या पांडव गुफेला खूप जवळ आहे.

*१. ब. ४. ५. गावातील हनुमान:*

डांग जिल्ह्यातील गावागावात हनुमानाचे मंदिर पाहायला मिळते. तो गावाचा गावदेव म्हणून ओळखला जातो. गावातील होणतीही महत्त्वाची पूजाविधी करण्याआधी या गावदेवाची म्हणजेच हनुमानाची पूजा केली जाते. लग्नामध्ये या हनुमानाला विशेष महत्त्व प्राप्त झालेले असते. अगदी मांडव पडल्या दिवसापासून तर वधू घरात आणेपर्यंत या गावदेवाला विसरून चालत नाही. इतकेच नाही तर वराड गावातून निघण्याआधी या गावदेवाची नारळ फोडून पूजा केली जाते आणि वराड घेऊन जाण्यास अलिखित जणू परवानगीच मागितली जाते. त्याचप्रमाणे वराड वधूला घेऊन आल्यावर याच गावदेवाच्या मंदिरात वधू वरास बसवले जाते. वधूच्या रूपाने गावात एका नवीन व्यक्तीची भर पडत असते ती भर पडावी म्हणून या गावदेवाला विनवणी केली जाते. कारण हनुमान हा गावदेवता म्हणून गावाचे रक्षण करत असतो असे या आदिवासींची मान्यता आहे.

वरील काही उल्लेखांवरून आपल्या लक्षात येईल की, रामायणातील आणि महाभारतातील बऱ्याच घटना डांग भागात घडल्याचे दिसून येते. तसेच एक दोन पुरावे आपल्याला हनुमानाच्या जन्माविषयी पाहायला मिळतात. वरील बरेच उल्लेख हनुमानाशी संबंधित आहेत. अशा हनुमानाचा जन्म नाशिकमधील अंजनेरीच्या डोंगरावर झाला की डांग जिल्ह्यातील अंजन कुंड येथे झाला हे विवादास्पद असले तरी ही दोन्ही स्थाने डांगला अतिशय जवळची आहेत. म्हणून कदाचित या भागामध्ये गावागावात हनुमानाचे मंदिर पाहायला मिळत असून त्याची मनोभावे पूजा केली जाते.

## १. ब. ५. सामाजिक जीवनाचा परिचय:

*१. ब. ५. १. डांगमधील जाती-जमाती:*

भौगोलिकदृष्ट्या पाहता डांग गुजरातमधील एक छोटासा जिल्हा असला तरी येथे जवळपास ९३% वस्ती आदिवासी जमातींनी भरलेली आहे. यामध्ये भिल्ल, कोकणा (कुंकणा/कोकणी/कुणबी), वारली, गावित/गामित या मुख्य जमातींबरोबरच विटोलिया/कोटवाळा, मावची, धोडिया, चौधरी, दुबळा, नायक, नायका इत्यादी जाती-जमाती डांगमध्ये आढळून येतात. या जाती-जमातींमध्ये रोटी-बेटी व्यवहार सहसा पाहायला मिळत नाही. ही प्रजा साधी, सरळ, भोळी असून निसर्गोपासक आहे. जाती-जमातीनुसार त्यांच्या बोलीत, राहणीत, व्यवहारात, वेशभूषेत, केशभूषेत, घरांच्या रचनेत, व्यवसायात, रीतीरीवाजांत, एकूणच सगळ्या संस्कृतीमध्ये थोडाफार फरक असल्याचे दिसते. प्रत्येक जमातीची आपली काही खास वैशिष्ट्ये आहेत. ती थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येतील.

भिल्ल ही डांगमधील प्रमुख आदिवासी जमात मानली जाते. तसेच ती महाराष्ट्र, गुजरात आणि भारतातीलही एक प्रमुख आदिवासी जमात म्हणून ओळखली जाते. ही जमात इतरही काही जमातींना आपल्या कवेत घेते, जसे चोधरा, धनका, धोडिया यांनाही भिल्ल म्हटले जाते. मात्र धनका, गावीत, पावरा इत्यादी जमाती या भिल्लांच्याच उपशाखा आहेत.[२१] भिल्ल ही जमात धनुर्धारी असून 'भिल्ल' शब्दाची उत्पत्ती भिलेवावर या तमिळ शब्दापासून झाली असावी. याचा अर्थ 'धनुष्यधारी' असा आहे. विल्सन यांच्या म्हणण्याप्रमाणे 'भिल्ल' हा शब्द 'बिली' या मूळ शब्दापासून तयार झाला. 'बिली' हा तमिळ शब्द असून त्याचा अर्थ धनुष्य असा होतो. धनुष्य हे भिल्लांचे वैशिष्ट्येपूर्ण असे हत्यार आहे.[२२] ह्या भिल्लांना एखाद्या दिवशी शिकार नाही मिळाली तरी ते इतर काम करण्याची तसदी घेत नाहीत. थोडक्यात म्हणजे ही जमात इतर जमातींपेक्षा आळशी आहे असे म्हटले जाते.

कोकणा ही जमात मुळची कोकणातली असावी असे अनेक अभ्यासकांचे मत आहे. 'कोकणा' हा शब्द कोकण (पश्चिमेकडील समुद्रकिनारपट्टी) या शब्दापासून आला असे सांगतात. एन्थोवेन असे म्हणतो की, प्रसिद्ध दुर्गादेवीच्या दुष्काळात कोकणा जमातीचे लोक देशोधडीला लागले व सन १३९६-१४०८ या काळात ते उत्तरेकडे सरकले.[२३] तर डांगच्या संदर्भात बोलायचे झाले तर कुणबी (कोकणा) आणि वारली कुटुंबांना डांग प्रदेशात आणण्याचे श्रेय गाढवी राज्याच्या भिल्ल राजवंशीयांना जाते.[२४] त्यांची भाषाही कोकणीच होती पण ती आता पहावयास मिळत नाही. त्यांच्यावर मराठी आणि गुजराती भाषेचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. ही जमात शिक्षणाच्या बाबतीत पुढारलेली असून ती पारंपरिक शेती करणारी आहे. या जमातीचे लोक शेतात घरे बांधून राहायला पसंत करतात.

वारली म्हटले की आपल्या डोळ्यासमोर दिसते ती त्यांची चित्र संस्कृती. या वारली चित्र संस्कृतीमुळेच ते आज जगभरात प्रसिद्ध झाले आहेत. ही त्यांची स्वतंत्र अशी एक कला आहे. ती इतर जाती-जमातीत विशेषतः दिसत नाही. पांढऱ्या रंगाने काळया तपकिरी कुडांवर व भिंतींवर रेखाटलेली ही चित्रे कितीतरी शोभून दिसतात. ही चित्रे काढण्यासाठी ते उभ्या आडव्या रेषा, त्रिकोण, चौकोन आणि गोलाकार यांचा वापर करतात. रंग म्हणून ते तांदळाचे पीठ, गेरू, काजळी, हळद, कुंकू, रंगीत फुले व झाडांचा चीक यांचा वापर करतात.[२५] ही चित्रे दिसायला साधी असली तरी त्यातून या समाजाने आपल्या संस्कृतीच्या अनेक बाजू मांडलेल्या असतात. शेकडो वर्षांपासून त्यांनी ही चित्र संस्कृती जपून ठेवताना निसर्गाशी एकरूपता राखण्याचा प्रयत्न केला आहे किंबहुना निसर्गातूनच त्यांची चित्र संस्कृती उदयाला येऊन परिपोष झाली आहे. त्यामुळेच त्यांच्या चित्रकलेत धार्मिक विधी, लग्नविधी, देवदेवता, दैनंदिन जीवन, लोकजीवन व त्याबरोबरच आजूबाजूचा परिसर, परिसरातील पशुपक्षी, वृक्षवेली, नदीनाले, डोंगर, पहाड, वने, जंगले, नाचनृत्ये, घरदार, शेतीचे हंगाम, शिवार, परिसर, जत्रा इत्यादी विषयाला धरून भिंती चित्रे रेखाटलेली दिसतात.[२६]

गावीत ही डांगमधील प्रमुख जमातींपैकी एक जमात मानली जाते. गावीत म्हणजे गावचे. ते गावचे प्रमुख असत म्हणून त्यांनी गावीत हे नाव धारण केले. गामीत किंवा गामता हे

'गावीत' याचे समानार्थक शब्द आहेत. गावीत, मावची, वसावे, पाडवी आणि वळवी अशा गावीत जमातीच्या बऱ्याच शाखा आहेत.[२७] म्हणजेच गावीत आणि मावची ह्या दोन्ही जमाती एकच असून त्यांच्या अजून काही उपशाखा निर्माण होतात असे डॉ. गोविंद गारे यांचे म्हणणे आहे. या जमातीचा मुख्य व्यवसाय शेती हा आहे. डांगच्या दृष्टीने यांची मुख्य वस्ती ही धुळे जिल्ह्याच्या सीमेलगत आहे.

तसेच इतर जमातीही डांगमध्ये आढळतात जसे की धोडिया, चौधरी, दुबळा, नायक, नायका, विटोलिया/कोटवालिया इत्यादी. ह्या जमातींच्या लोकांची संख्या कमी असली तरी ते डांगच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहेत. उदा. विटोलिया ह्या जमातीचा बांबूपासून वेगवेगळ्या वस्तू बनवण्याचा स्वतंत्र व्यवसाय आहे. ह्या त्यांच्या व्यवसायामुळे डांगच्या लोकांना इतरत्र बांबूपासून बनवल्या जाणाऱ्या वस्तूंसाठी भटकंती करावी लागत नाही. तसेच डांगच्या उत्पादनातही त्यांचा खारीचा वाटा आहेच हे विसरून चालत नाही.

*१. ब. ५. २. घरांची रचना:*

डांगी आदिवासी गरीब असल्याने त्यांचा उदरनिर्वाह जंगलावरच अवलंबून असतो. साहजिकच त्यांच्या निवाऱ्याचा विचार करता ते या जंगलावरच विसंबून आहेत. त्यांच्या घरांच्या भिंती जंगलातील बांबू या वनस्पतीपासून तयार केलेल्या खपाड्याच्या किंवा कुडाच्या असून त्या शेणामातीने सारवलेल्या असतात. घरावर छप्पर म्हणून पळसाची पाने, सागाची पाने, भाताची तनस, गवत तसेच मातीच्या कौलांचा वापर केलेला असतो. मागच्या एक दोन दशकापासून काही जमाती पुढारल्याने त्यांच्या घरांवर पत्र्यांचा वापर झालेला दिसून येतो. तर भिंतीही विटा मातीच्या दिसून येतात. घराला वासे, खांब, खिडक्या ह्या वस्तू जंगलातील लाकडापासून बनवले जातात. हे बनवणारे कारागीरही त्या त्या जमातींमध्येच उपलब्ध होतात. त्यामुळे त्यांना इतरत्र कारागीरांसाठी भटकावे लागत नाही. हे कारागीरही कुशल असल्याने त्यांच्या वास्तूंवर वेगवेगळी चित्रे, नक्षीकाम पाहायला मिळते.

जवळपास प्रत्येक आदिवासी घरात स्वयंपाकघर वेगळे केलेले असून ते शक्यतो मूळ घराला जोडूनच एका बाजूला तयार केलेले असते. या घरात स्वयंपाकासाठी लागणाऱ्या सर्व वस्तू उपलब्ध असून त्यातही काही बांबूपासून किंवा लाकडापासून बनवलेल्या असतात. उदा. पोळपट, लाटणं, झडपी, सूप, डालखी/टोपली, रवी, चाटू, हंडा ठेवण्यासाठी लाकडी स्टँड, शिका, क्वचित भांडे ठेवण्यासाठी लाकडी मांडणी, बसण्यासाठी पाट इत्यादींचा वापर केला जातो. शक्यतो घरातील अन्न-धान्य ठेवण्यासाठीही स्वतंत्र व्यवस्था असते. त्याला हे आदिवासी 'माची' असा गोंडस शब्द वापरतात. त्याला आपण घरातील छोटा माळा म्हणू शकतो. हा माळा माजघरात असून तो साधारणतः माणसाच्या उंचीएवढा उंच असतो. त्यावर चढण्यासाठी लाकडी शिडीचा (डांगीमध्ये 'मार्डी') उपयोग केला जातो. या माळ्यावर लहान मोठ्या अनेक भवाळ्या/कणग्या, झिल्या, डवल्या, मुड्या असतात. त्यामध्ये वेगवेगळी धान्ये साठवली जातात. तसेच घराच्या एखाद्या कोपऱ्यावर आडवा बांबू टाकून त्यावर हळद किंवा मक्यासारखे पदार्थ टांगून ठेवले जातात.

घराच्या एका बाजूला गाई-गुरांसाठी गोठा केलेला असतो. त्यात गाय, बैल, रेडा, म्हैस, कोंबड्या आणि गुरांसाठी चारा ठेवलेला असतो. अशी थोडक्यात घरांची रचना असून ही सर्व घरे चौमौळी किंवा दोन पखडी असतात. ह्या व्यतिरिक्त घरांचे आकार या आदिवासींमध्ये सहसा पाहायला मिळत नाहीत.

*१. ब. ५. ३. पाळीव जनावरे:*

आदिवासी जमाती पूर्वीपासून जंगलात राहात असल्याने त्यांना जंगली श्वापदांपासून रात्रीच्या वेळी संरक्षण म्हणून कुत्र्यांसारख्याची गरज निर्माण झाली असावी. तसेच शिकारीसाठीही या कुत्र्यांचा चांगलाच उपयोग होत असल्याने या आदिवासींनी कुत्र्यांना आपलेसे केले आहे. हा आदिवासी जंगलात जाताना काठी, कुऱ्हाड आणि बरोबर कुत्रं घेऊन जायला विसरत नाही. याच्या पायात एकवेळ चप्पल दिसणार नाही परंतु ह्या तीन वस्तू मात्र त्याकडे खात्रीने दिसतील. या कुत्र्यांना इतके वळण असते की, काही कुत्रे स्वतःच शिकार करून मालकाकडे आणून देतात. त्यामध्ये छोट्या पक्ष्यांपासून तर सशांसारख्या प्राण्यांपर्यंतचा समावेश असतो.

पूर्वी ज्याच्याकडे खूप गायी तो अधिक धनवान असे समजले जाई. म्हणून जवळपास सगळयाच आदिवासी कुटुंबाकडे किमान चार पाच तरी गायी गुरे असायची; तर काहींकडे शंभराच्या वर असायची; परंतु आता हे प्रमाण कमी होताना दिसते आहे. याची दोन तीन कारणे सांगता येतात ती अशी की, एकतर वनविभागाने जंगलात चराई करण्यास मनाई केली आहे, दुसरे म्हणजे सध्याच्या औद्योगिकीकरणाच्या युगात गायी गुरांचे महत्त्व कमी झाले आहे, तिसरे म्हणजे शेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. असे असले तरी आजही बरेच आदिवासी या जनावरांचा उपयोग वेगवेगळया कारणासाठी करून घेताना दिसतात. या आदिवासींकडे रेड्यांची संख्या इतर प्राण्यांच्या तुलनेत जास्त आहे असे दिसते. कारण रेडा हा जड कामासाठी चांगला समजला जातो. तो जंगलातील मोठी लाकडे ओढून आणण्यास खूप उपयोगी ठरतो. तसेच त्याला उन्हाळयात चारण्यासाठी गुराख्याची गरज भासत नाही. त्याला सकाळी जंगलात हाकून देतात आणि मग तो त्याचं त्याचं चरून संध्याकाळी बरोबर आपल्या घरी निघून येतो. म्हणून कदाचित रेडा हा प्राणी या आदिवासींसाठी पाळायला सोपा जात असावा. तसेच त्याच्याकडे बैल, गायी, शेळयाही असतात या सर्वांचे तो जीवेभावे पालन पोषण करतो.

आदिवासी हा मुळातच मांस भक्षक असल्याने त्याच्याकडे साहजिकच कोंबड्या बकऱ्याही असतात. सण-उत्सवप्रसंगी ह्यांचा हा एक मौलिक आहार असतो. म्हणून त्याची व्यवस्था आधीच करून ठेवली जाते. तसेच क्वचित प्रसंगी घराची शोभा वाढविण्यासाठी पोपट पाळले जातात. तर काही ठिकाणी चीन कोंबडी, बदके, ससे इत्यादीही पाळले जातात.

*१. ब. ५. ४. आदिवासींचा वाडा:*

'वाडा' म्हणजे राजवाडा नव्हे किंवा राजा महाराजांचा महल नव्हे. तर डांगी आदिवासींचा वाडा म्हणजे ज्यामध्ये जीवनोपयोगी वेगवेगळया वस्तूंचे उत्पादन घेतले जाते ती जागा. ही जागा घराच्याच आगेमागे कुठेतरी जवळपास असते. जेणेकरून त्याकडे लक्ष ठेवता येईल.

हा वाडा डांगी आदिवासींसाठी खूप महत्त्वाचा असतो. हा वाडा प्रत्येक कुटुंबाकडे स्वतंत्र असून तो त्यांच्या जीवन जगण्याचा एक महत्त्वाचा भाग असतो. या वाड्यात वेगवेगळया दैनंदिन जीवनोपयोगी वस्तू लावल्या किंवा पेरल्या जातात. त्यामध्ये हळद, मिरची, अळू, मका, कारले, दोडके, गिलके, चवळी, काकडी (डांगीमध्ये 'वाळूक'), खरबूज (डांगीमध्ये 'दोड'), भेंडी, वाल किंवा वालखड, दुधी, भोपळा, डांगर, देवडांगर, माटा, गोयची किंवा कोयची, रवा (डांगीमध्ये 'वरा'), काळी ज्वार, गवार इत्यादी वस्तूंचे उत्पादन ह्या एकाच वाड्यात घेतले जाते. ह्या सगळ्या वस्तूंची नुसती मोजदाद केली तरी आपणास असे लक्षात येते की, हा आकडा वीसच्या वर जातो. यावरूनच समजावे की हा वाडा डांगी आदिवासींसाठी किती महत्त्वाचा असेल. यातील काही पिके झाडांच्या रुपात असतात, काही वेलींच्या रूपात असतात तर काही गवतसदृश असतात. या सगळयांची लागवड एकाच वेळी पावसाचे पहिले पाणी पडले की सुरु होते. सगळयांची लागवड जरी एकाच वेळी केलेली असली तरी पिक मात्र एकाच वेळी येत नाही. एकाच वेळी पिक न आल्याने त्यांना दीर्घकाळपर्यंत वाड्यातून पालेभाज्या मिळत राहतात. हा वाडा घराच्याच जवळ असल्याने सकाळ-संध्याकाळ केव्हाही एखादी भाजी लागली तर लगेच या वाड्यात जाऊन तोडून आणली जाते. या हंगामात हा आदिवासी सहसा बाजारातून भाजीपाला विकत आणत नाही हे त्याचे विशेष आहे.

या वाड्यात आजूबाजूची गुरेढोरे जाऊ नये म्हणून दाट कुंपण केलेले असते. तसेच वेलांना वर चढण्यासाठी वाळलेल्या झाडाच्या किंवा बांबूच्या फांद्या उभ्या केल्या जातात. या उभ्या केलेल्या फांद्यांना हे आदिवासी "खोस्या" म्हणतात. तसेच प्रत्येक घरापुढे उन्हाळयात चारा ठेवण्यासाठी मांडव केलेला असतो. या मांडवाचाही ह्या वेळेला वेली चढवण्यासाठी उपयोग करून घेतला जातो. असा हा आदिवासींचा वाडा आदिवासींच्या जीवनात एक महत्त्वाची भूमिका पार पाडत असतो.

### *१. ब. ५. ५. आहार:*

डांगी आदिवासी हा जंगलातूनच वेगवेगळया हंगामात आपल्या आहाराची सोय करून घेतो. पाऊस पडल्यानंतर थोड्याच दिवसात त्याला जंगलातून वेगवेगळया भाज्या उपलब्ध होतात. त्यामध्ये तेऱ्याची भाजी, वाथ्रटाची भाजी, वासत्याची भाजी, चाईची भाजी, कोवळीची किंवा कवळीची भाजी, दिवलीची भाजी, अळूची भाजी इत्यादी भाज्या उपलब्ध होतात. "ठाणे जिल्ह्यात कोवळीचा सण म्हणून साजरा केला जातो. हा सण पावसाळयाच्या सुरुवातीला जंगलात अनेक कोवळया भाज्या उगवल्यावर साजरा केला जातो."[२८] असाच एक सण या डांगमध्येही साजरा केला जातो त्याला डांगी लोक "तेरा" या नावाने ओळखतात. वरील कोवळीच्या सणामध्ये आणि तेऱ्याच्या सणामध्ये बरेच साम्य दिसते. या दोन्ही सणांचा उद्देश आणि हेतू एकच असल्याचे दिसते. तेरा हा सण पावसाळयाच्या सुरुवातीला साजराकेला जात असून या हंगामात जंगलात खूप वेगवेगळया प्रकारच्या भाज्या उपलब्ध असतात. मात्र तेरा हा सण साजरा केल्यानंतरच इतर भाज्यांचे सेवन हे आदिवासी करतात. त्या आधी हे भाताची किंवा इतर कोणत्याही शेतीची लावणी करत नाहीत. तेरा सण साजरा केला की हे शेतीच्या लावणीला तयार होतात.

मांसाहारासाठी ते जंगलातून वेगवेगळी शिकार करून आणतात. नदी नाल्यातून मासे, खेकडे, झिंगे धरून आणतात. घरातील कोंबडे बकरे कापतात. या सगळयांचा त्यांच्या मांसाहारी आहारामध्ये

समावेश होतो. गुजराती साहित्यिक डॉ. प्रभु आर. चौधरी हे त्यांच्या 'डांगी लग्नगीतो एक अभ्यास' या पुस्तकात म्हणतात की, "माछली मारवा अथवा शिकार करवा जवूं अे अेमनो व्यवसाय (छे)."[२९] म्हणजे मासे मारायला किंवा शिकार करायला जाने हा यांचा व्यवसाय आहे.

त्याचबरोबर शेतीतून उत्पन्न केलेले भात, नाचणी/नागली, वरई, उडीद, तूर, खुरसणी, भुईमुग इत्यादींचा आपल्या आहारात वापर करतात. त्यातच भात हे त्यांचे मुख्य उत्पादन आहे. त्यांच्या रोजच्या आहारात भाताचा समावेश असतोच असतो. ते भात रांधूनही खातात आणि भाताच्या पीठाच्या भाकरी करून खातात. भाताच्या पीठाच्या भाकरी रोज बनवून खाणे ही रीत त्यांच्यात पाहायला मिळते तसे इतरत्र पाहायला मिळत नाही. अशा वेगवेगळया पदार्थांचे सेवन करताना दिसून येते.

*१. ब. ५. ६. वेशभूषा:*

डॉ. नरेश कवडी डांगी आदिवासींच्या वेशभूषेविषयी म्हणतात की, "स्त्रीपुरुषांची वेशभूषा तोडकी असते. कमरेचे वस्त्र गुडघ्यापर्यंत आले म्हणजे पुष्कळ झाले. छातीवरून लुगड्याचा पदर घ्यायलाही स्त्रिया अलीकडेच शिकल्या आहेत."[३०] डांगी आदिवासी पुरुषवर्गात अंगात शर्ट, छोटी चड्डी, धोतर, बंडी, सदरा, डोक्यावर गांधी टोपी किंवा फेटा बांधला जातो. कमीत कमी कपडे यांच्या अंगावर दिसतात. याची दोन कारणे येथे देता येतील. एक म्हणजे या भागात उष्णदमट वातावरण असल्याने गर्मी खूप असते त्यामुळे अंगावर जास्त वेळ आणि जास्त कपडे ठेऊ वाटत नाही. या वातावरणामुळे त्यांना कमी कपडे घालण्याची सवय झाली असावी. दुसरे म्हणजे येथील गरिबी. या गरिबीमुळेही त्यांना वेळेवर चांगले नवे कपडे खरेदी करता येत नाहीत. लहान मुलांमध्ये चार पाच वर्षांचे होईपर्यंत अंगावर कपडे नसतात. याचेही कारण गरिबी हेच आहे. हे प्रमाण आता कमी कमी होत आहे ही एक समाधानाची गोष्ट आहे.

तर स्त्रीवर्गामध्ये लुगडे, चोळी, पोलके, डोक्यावर फडकी, गाउंड (डांगीमध्ये 'नाईटी') इत्यादी वापरले जातात. या स्त्रियांमध्ये साडी नेसण्याची पद्धत खूप कमी पाहायला मिळते. तसेच सासरे, जेठ, जावई यांना बघून त्या डोक्यावर पदर घेत नसून याबाबतीत त्या मनमोकळया आहेत.

*१. ब. ५. ७. अलंकार:*

अलंकाराच्या बाबतीत पुरुषांपेक्षा स्त्रिया आघाडीवर असल्याचे दिसते. स्त्रिया हातात बांगड्या, कानात कडी/रिंग, दंडावर चांदीचा ठसठशीत बाजीबंद, कंबरेला चांदीचा करगोटा/कंबरेची साखळी, नाकात ओठापर्यंत रेंगाळणारी नथ, गळयात डोरले, सोनेरी मणी व काळे मणी ओवून मंगळसूत्र गाठून घालतात, मावची स्त्रिया गळयात पांढऱ्या गाठी घालतात. पायाच्या बोठात जोडवी, पायात पैंजण/तोरड्या, गळयात किंवा हाताच्या दंडात तांब्या-रुप्याचे ताईत, पायात चांदीचे वाळे, गळयात पितळेच्या साखळया किंवा चवल्या, पावल्या व रुपयांच्या माळा, कानांत तांब्यापितळेची क्वचित चांदीची सुंकली इत्यादी अलंकार वापरतात. याचे प्रत्येय आपल्याला काही लोकगीतांतुनही पाहायला मिळतात.

१.

*कडु जी राया जीव माझा रमिला*
*बंगली बांधाया हा बंगली बांधाया*
*पायाचा **तोडा** मोडला का तोडला बंगली बांधाया*
*गळेचा **हारू** मुडला का तुडला बंगली बांधाया*
*नाकाची **नथ** मुडली का तुडली बंगली बांधाया*
*दंडाची **येळी** मुडली का तुडली बंगली बांधाया*
*कानाचे **काप** मुडले व तुडले बंगली बांधाया*[३१]

२.

*तुझी किनार पिवळी दिस*
***हारू** या जोड जोड या जोड*
*आडवा धरुं व जोड या जोड*
*आडवा धरुं व **येळ** या जोड*
*आडवा धरुं व **सर** या जोड*
*आडवा धरुं व **काप** या जोड*
*आडवा धरुं व **नथ** या जोड*[३२]

हे अलंकार परिधान करण्यासाठी त्या नाक कान टोचून घेतात. वर उल्लेखित बरेच अलंकार हे चांदी या धातूचे असतात. तर कित्येक वेळा ते कवड्यांचाही उपयोग अलंकार म्हणून करतात. परंतु खेदाची बाब अशी की यातील बरेचसे अलंकार आता फक्त सांगण्यापुरतेच बाकी आहेत. तर काही डांगच्या लोकसंस्कृतीचे जतन करणारे एकमेव केंद्र म्हणजे सापुतारा येथील 'वस्तू संग्रहालय' येथे हे अलंकार कधीच बंदिस्त झाले आहेत. ते मला माझे वडील श्री यशवंत रेवजी गायकवाड यांच्या सहकार्याने पाहायला मिळाले व त्या अलंकारांविषयी इत्थंभूत माहितीही मिळाली. तसेच डॉ. तुकाराम रोंगटे हे आपल्या 'आदिवासी आयकॉन्स' या ग्रंथाच्या पहिल्याच पानावर लिहितात की, "आदिवासी स्त्रियांना इतर दुसऱ्या बलाढ्य टोळ्यांनी पळवून नेऊ नये म्हणून त्यांच्या कपाळावर, हातांवर गोंदूण घेतले जात असे. ते काही अंधश्रद्धेपोटी नव्हे, तर मुळात त्याचे कारणच असे होते की, आदिवासी स्त्रियांना पळवून नेलेच तर त्या स्त्रिया पुन्हा शोधायला सोप्या जाव्यात म्हणून, हा उदात्त हेतू त्याच्या मागे असायचा."[३३] तसेच चिंतामण गणेश कर्वे म्हणतात त्याप्रमाणे "वैदू लोकांच्या स्त्रिया आजार, दृष्टीबाधा वगैरेंचे निवारण करण्यासाठी लोकांना गोंदण्याचा धंदा करतात. गोंदणे ही एक जादूविद्याच आहे. हिरवा रंग जीवनदायी मानीत असल्याने पानाच्या (येथे कोणत्या वनस्पतीचे पान हे निश्चित केलेले नाही.) रसाने गोंदण्यात येते."[३४] हे उपरोक्त दोन्ही अभ्यासकांचे विचार एकेकाळी खरेही असू शकतात. परंतु सध्याच्या स्त्रिया मात्र आपल्या अंगावर गोंदूण घेणे हा एक अलंकारच मानतात. या गोंदण्या मागे एक समज असाही आहे की, 'जर आपल्या आयुष्यात एकदाही गोंदले नाही तर गाढवाच्या पोटी जाते.' किंवा 'मृत्यू पावल्यानंतर स्वर्गात व्यक्तीच्या मागे फक्त हे गोंदलेलेच येते बाकी काहीही येत नाही.' या भीतीपोटीही कदाचित पूर्वीपासून हे आदिवासी आपल्या अंगावर गोंदूण घेत असावेत.

पुरुषांच्या बाबतीत अलंकारांची संख्या खूप कमी दिसते. तसेही पाहता शृंगार हा स्त्रियांचा मूळ धर्म आहे. म्हणून पुरुष या बाबतीत मागे पडणारच, तरीही काही अलंकारांचा उपयोग ते आपल्या जीवनात करतात. जसे की कानात भिकबाळी घालणे, हाता पायात एखादा चांदीचा कडा घालणे, हाताच्या बोटात अंगठी घालणे असे तुरळक अलंकार ते वापरतात. तसेच अंगावर स्त्रियांप्रमाणे गोंदूण घेतात. परंतु ते कपाळावर मात्र गोंदत नाहीत, तर ते हातावर, हाताच्या दंडावर, छातीवर अशा वेगवेगळ्या शरीरावयवांवर गोंदूण घेतात.

*१. ब. ५. ८. बोलीभाषा:*

डांग जिल्ह्यात प्रामुख्याने डांगी बोली बोलली जाते. डांगी हे नाव प्रादेशिक असून डांग म्हणजे जंगल असा त्याचा थोडक्यात अर्थ घेतला जातो. डांगी बोली ही अहिराणीशी साम्य दाखविणारी असली तरी तिचे अस्तित्त्व पूर्णपणे वेगळे आहे हे नाकारता येत नाही. या बोलीवर मराठीचा आणि गुजरातीचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. डांगी बोलीचे जातीनुसार वेगवेगळे प्रकार पडतांना दिसते. जसे भिल्ली बोली, कोकणी बोली इत्यादी जातीवर्गानुसार प्रकार आढळतात. असे असले तरी या संपूर्ण भूप्रदेशात अधिक प्रमाणात डांगी बोलीला महत्त्वाचे स्थान आहे.

डांगी बोलीला अजूनही लिखित स्वरूप प्राप्त झालेले नाही. गाढवी विभागातील बोली ही मूळ डांगी बोली म्हणून ओळखली जाते. जसे जसे आपण दक्षिणेकडे जातो तसे तसे आपल्याला डांगी बोलीवरील मराठीचे प्रभाव अधिकाधिक जाणवायला लागते. येथे डांगी बोलीविषयी अधिक लिहित नाही कारण प्रस्तुत प्रबंधाच्या शेवटच्या प्रकरणात याविषयी स्वतंत्र विवेचन केलेले आहे.

*१. ब. ५. ९. सण-उत्सव:*

डांगी आदिवासी समाज हिंदू धर्मानुसार अनेक सण साजरे करतो. परंतु काही असेही सण आहेत की ते त्यांच्यापुरतेच मर्यादित आहेत. पावसाळ्यात पावसाला सुरुवात होऊन थोड्याच दिवसात जंगलामध्ये हिरव्या पानाची 'तेरा' नावाची भाजी उगवते. ती भाजी 'तेरा' या सणाच्या दिवशी आपल्या इष्टदेवतेला किंवा गावदेवतेला म्हणजेच हनुमानाला अर्पण करून मगच तेरा या भाजीबरोबरच इतर भाज्यांचे सेवन करतात.

'पोळा' हा सण येथील आदिवासींमध्ये महत्त्वाचा मानला जातो. आदिवासी म्हटला की त्याच्याकडे बैल हा आलाच, अशा बैलाची या सणाला यथायोग्य पूजा केली जाते.वर्षभर बैलाला खूप काम असते त्यामुळे या दिवशी त्याला पूर्ण विसावा दिला जातो. त्याची नदी नाल्यावर नेऊन अंघोळ केली जाते. त्याच्या शिंगांना वेगवेगळे रंग लावून रंगीबेरंगी गोंडे बांधले जातात. काही गावातून तर त्यांची मिरवणूकही काढली जाते. अशा वेळी जो तो आपापल्या बैलांना इतरांच्या बैलांपेक्षा जास्त वेगळेपणाने सजवण्याचा प्रयत्न करतो. बैलाच्या अंगावर रंग किंवा गेरू माखलेल्या हाताचे पंजे उमटवले जातात. त्याला संध्याकाळी दिवा ओवाळून पूजा करून पुरण पोळीचा घास भरवला जातो. हा सण खऱ्या अर्थाने बैलांसाठी साजरा केला जातो. यावरून हे लक्षात येते की बैल हा येथील आदिवासींसाठी खूप महत्त्वाचा आहे.

येथील आदिवासी जनता 'दिवाळी/दीपावली' या सणालाही अतिशय महत्त्व देतांना दिसतो. दिवाळी सणाचा आनंद ते "भाजीपालाखाई वाचनाव त दिवाळी नाचनाव"[३५] अशा पद्धतीने व्यक्त करतात. या सणाला आदिवासी आपल्या मुलाबाळांना नवीन कपडे खरेदी करतात. संध्याकाळी चिबडाच्या दोन फोडी (दोन तुकडे) करून त्याच्या आतील गराचा भाग काढून घेऊन त्यात थोडेसे तेल घालून दिवा तयार केला जातो आणि तो गोठदाराशी लावला जातो. या दिवशीही गायी गुरांची पूजा केली जाते. रात्रीच्या वेळी गावातील किंवा परगावातील माणसे धिंडवाळी घेऊन येतात. ही धिंडवाळी वसू बारशाच्या दिवसापासून तर साधारणतः लक्ष्मीपूजनच्या दिवसापर्यंत काढली जाते. यावेळी सहभागी पुरुष मंडळी गायी गुरांची किंवा वेगवेगळ्या देवदेवतांची नावे घेऊन गाणे म्हणतात. हे गाणे म्हणताना ते तेल, पीठ, पैसे किंवा इतर धान्याच्या स्वरुपात देणगी जमा करतात.

'होळी' हाही आदिवासींचा एक महत्त्वाचा सण मानला जातो. होळी सणाची परंपरा खूप जुनी पाहायला मिळते. हा सण येथील आदिवासी मोठ्या उत्साहाने साजरा करतात. हा सण एकूण पाच ते सात दिवसांचा असतो. या पाच ते सात दिवसांत होळीतील अग्नी क्षणभरासाठीही विझू देत नाहीत. रात्रीच्या वेळी प्रत्येक घरातील एकतरी व्यक्ती होळीच्या जागरणाला येत असते. या काळात वेगवेगळे कार्यक्रम साजरे केले जातात. त्यामध्ये प्रामुख्याने तमाशा, कथा, गाणे इत्यादींचा समावेश होतो. तर काही मंडळींनी पत्त्याचा डावही मांडलेला असतो. मात्र सगळ्यांचा हेतू एकच असतो तो म्हणजे होळीला जागरण. या काळात गावागावात शिमगा खेळला जातो. आज शहरी भागात शिमग्यानिमित्त वेगवेगळे आधुनिक रंग वापरले जातात, त्याचा दुष्परिणामही आपल्याला दिसून येतो. मात्र येथील आदिवासी अशा रंगांचा फारसा वापर करत नाही, तर तो जंगलातील पळस या वनस्पतीची केसरी फुले तोडून वाळवून त्यापासून जे रंग बनवतात त्याचाच उपयोग ते या शिमग्यामध्ये करतात. म्हणून ते रंगांच्या दुष्परिणामापासून बचावतात. वेळ प्रसंगी ते पाण्याचा, चीखलाचाही वापर शिमगा खेळण्यासाठी करतात. शेवटच्या दिवशी प्रत्येक घरातील एका व्यक्तीने तांब्यात नवे पाणी (उष्ट न केलेलं) घेऊन, एका वाटीत खोबऱ्याचा कीस किंवा तुकडे आणि त्यात थोडी साखर घेऊन, होळीची शेवटची पूजा करून विझवली जाते. होळी विझल्यानंतर मात्र शिमगा खेळणे बंद केले जाते. तसेच या होळी सणाच्या दरम्यान वेगवेगळ्या भागात यात्रा भरतात. या यात्रांचाही ते मनमुराद आनंद लुटतात. 'अक्षयतृतीया'च्या दिवशीही येथील आदिवासी लोक 'आखाती' नावाने सण साजरा करतात. हा सण पितृदेवांचा आहे असे म्हटले तर वावगे ठरू नये. कारण या सणाला पितृदेवतांना (घरातील मृत व्यक्ती) पुरण पोळी, मासे, दारू, वरण, भात, भाजी इत्यादी पदार्थ घरावर फेकून "काव काव ये, काव काव ये" अशा पद्धतीने कावळ्यांना बोलावून नैवद्य दाखवला जातो. या दिवशी कावळयांच्या रूपाने घरातील पूर्वज जेवायला येतात असा समज आहे. जर घरावर कावळे आले नाहीत आणि नैवद्याचा घास उचलला नाही तर घरात नक्कीच काहीतरी चुकीचं झालं आहे किंवा आपल्या पूर्वजांना काहीतरी कमी पडते आहे म्हणून कावळे येत नाहीत. त्यांना दारू कमी पडते का?, मासे कमी पडतात का? किंवा एखाद्या पुर्वजाचे नाव घेतले गेले नाही का? म्हणून कावळे येत नाहीत. असे वेगवेगळे तर्क वितर्क लावले जातात. थोडक्यात या दिवशी कावळयांच्या रुपात आपल्या पूर्वजांना पाहिले जाते. म्हणून कावळयांनी नैवद्य उचलणे शुभ मानले जाते तर कावळयांनी नैवद्य न उचलणे अशुभ मानले जाते.

असे अनेक सण येथील आदिवासी आपापल्या पद्धतीने साजरे करतात. त्या प्रत्येक सणाचे महत्त्व आणि त्यामागील त्यांच्या धारणा, समज वेगवेगळे आहेत.

### १. ब. ६. डांग जिल्ह्याचा राजकीय इतिहास:

डांगच्या इतिहासाचा विचार करता तो महाभारत, रामायणापर्यंत मागे घेता येतो हे याआधीच आपण बघितले आहे. त्यानंतर मात्र कित्येक शतकांचा इतिहास स्पष्टपणे उपलब्ध होत नाही. येथे टप्याटप्याने घडलेल्या घटनांच्या आधारे डांगच्या राजकीय इतिहासाचा परिचय करून घेणार आहोत.

#### *१. ब. ६. १. शिवकाल:*

छत्रपती शिवाजी महाराज यांनी ६ ते १० जानेवारी १६६४ दरम्यान सुरतेची लूट केली, त्यानंतर परत ४ ऑक्टोबर १६७० मध्ये सुरतेची दुसऱ्यांदा लूट केली ती या डांगमार्गानेच. या सुरत लुटीची साक्ष डांगच्या सरहद्दीवरील साल्हेर, मुल्हेर आणि हतगड सारखे किल्ले देतात.

"शिवाजी महाराजांनी इ. स. १६६३ मध्ये साल्हेर व मुल्हेर हे दोन्ही किल्ले जिंकून घेतले आणि महाराजांनी आपली स्वराज्याची सरहद्द वाढविली ती थेट गुजरातपर्यंत"[३६] (आताचा संपूर्ण डांग जिल्हा). त्यामुळे सुरत लुटीला सोपे गेले असावे. अशा पद्धतीने एकेकाळी डांग प्रदेश हा बागलाण प्रांताशी जोडला होता असे दिसते. ही सत्ता पेशवे काळातही टिकून होती असे दिसते.

#### *१. ब. ६. २. इ. स. १८१८ नंतरचा राजकीय इतिहास:*

"यादवकाळापासून ते पेशवेकाळापर्यंत डांगमध्ये अनेक राजकीय सत्ता येऊन गेल्या असल्या तरी डांग प्रदेश येथील भिल्ल राजांच्या आणि नायकांच्या अधिपत्याखाली स्वतंत्र नांदत होता. त्यावेळी गाढवी, जामला, दर्भावती, वाडियावन, वासुर्णा, पिंपरी, शिवबारी, चिंचलीगडद, अवयर, पिपलाईदेवी, पळसविहीर, बिलबारी, झरी, गारखडी इत्यादी राज्य मिळून डांग बनला होता. यामध्ये गाढवीचा राजा वरिष्ठ मानला जाई. यांच्यात राजे आणि नाईक मिळून तेरा भिल्ल तर एक कोकणा होता."[३७]

"१८४२ मध्ये डांगी राजांनी इंग्रजांपुढे हतबल होऊन डांगचा संपूर्ण जंगल/प्रदेश इंग्रजांना करार करून देऊन टाकले. त्याबदल्यात त्यांना वार्षिक ११,२३० रु. देण्याचे ठरले."[३८] आणि येथेच डांगी राजांची राजकीय सत्ता संपुष्टात आली असे म्हटले जाते. असे असले तरी कमी अधिक प्रमाणात त्यांची डांगी प्रजेवर स्वातंत्र्य मिळेपर्यंत मर्जी होती.

#### *१. ब. ६. ३. मुंबई द्विभाषिक राज्य:*

१५ ऑगस्ट १९४७ ते १ मे १९६० दरम्यान भारतात अस्तित्त्वात असलेला एक महत्त्वाचा घटक राज्य म्हणजे मुंबई द्विभाषिक राज्य. या राज्याची उत्तरेकडील सीमा ही थेट बनासकांठापर्यंत होती तर दक्षिणेला धारवाड, उत्तर कन्नडपर्यंत होती. यामध्ये उत्तरेला गुजराती, मध्य प्रांतात मराठी आणि दक्षिणेला कन्नड अशा प्रमुख तीन भाषा बोलल्या जात असत.[३९] या तीन भाषांचे एक राज्य

जास्त काळ टिकणे शक्य नव्हते. तत्पूर्वी देशात भाषावार प्रांतरचना होतच होती. त्याचे पडसाद या राज्यावरही उमटले आणि मराठी भाषिक संयुक्त महाराष्ट्राची मागणी करू लागले तर गुजराती भाषिक स्वतंत्र गुजरात राज्याची मागणी करू लागले. आणि मग खरा प्रश्न उभा झाला तो डांगचा.

*१. ब. ६. ४. महाराष्ट्र आणि गुजरात राज्याची निर्मिती:*

संयुक्त महाराष्ट्राची आणि स्वतंत्र गुजरात राज्याची निर्मिती जोर धरू लागताच डांगचा प्रश्न पुढे आला आणि डांग महाराष्ट्रात सामील व्हावा यासाठी मराठी भाषिक प्रयत्न करू लागले. तर दुसरीकडे डांग गुजरातमध्ये सामील व्हावा यासाठी गुजराती भाषिक प्रयत्न करू लागले. केंद्रात, राज्यात तसेच या प्रांतातही काँग्रेसचेच नेते आघाडीवर होते. म्हणून आपापसात विचार करून डांगचा प्रश्न सोडवावा असा निर्णय झाला, परंतु तो शेवटास गेला नाही. यासाठी 'डांग जिल्हा लोकल बोर्डा'ची स्थापना करून त्याद्वारे डांगच्या निर्णयासाठी १९५७ मध्ये एक निवडणूक घेण्यात आली. निवडणुकीच्या अंतिम निकालावर डांगचा प्रश्न सुटणार होता. तो महाराष्ट्रात राहील की गुजरातमध्ये हा प्रश्न सुटणार होता. पण महाराष्ट्राच्या दुर्दैवाने ३० सभासदांपैकी फक्त चारच सभासद निवडून आले आणि गुजरातचे ३० सभासदांपैकी २६ सभासद निवडून आले. याचा परिणाम म्हणून डांग गुजरातला जाणार हे निश्चित झाले.[४०]

'इ.स. १९५६ च्या राज्य पुनर्रचना नियमानुसार भाषावार प्रांतरचना करण्यात आली. त्यानुसार १ मे १९६० रोजी मुंबई द्विभाषिक राज्याचे विभाजन झाले.'[४१] त्याआधारे संयुक्त महाराष्ट्र आणि डांगसह गुजरात अस्तित्त्वात आले.

**१. ब. ७. शैक्षणिक परिचय:**

*१. ब. ७. १. औपचारिक शिक्षण:*

औपचारिक शिक्षणाची सुरुवात खऱ्या अर्थाने ब्रिटीश काळात भारतात झाली असली तरी तिची मर्यादा शहरी भागापुरतीच मर्यादित होती हेही मान्य करावे लागते. आपण ज्या भूप्रदेशाचा परिचय करून घेत आहोत तो भूभाग जंगलांनी गच्च भरलेला, नदी-नाल्यांनी भरलेला, पशु-पक्ष्यांनी भरलेला, डोंगर-दऱ्यांनी भरलेला असा आहे. या भूप्रदेशात राहणाऱ्या आदिवासींना शहरी भागाचा गंधही नाही. मग शिक्षणाचा कोठून असणार? "भारतातील शिक्षणाचा पाया १८८२ मध्ये इंडियन एज्युकेशन कमिशनच्या स्थापनेनंतर घातला गेला. या नंतर तीन प्रकारच्या शैक्षणिक संस्था अस्तित्त्वात आल्या. त्या म्हणजे डे स्कूल, बोर्डिंग स्कूल आणि आश्रमशाळा. हे तीनही प्रकार आदिवासी भागातअस्तित्वात होते."[४२]अशी नोंद डॉ. शौनक कुलकर्णी यांच्या 'महाराष्ट्रातील आदिवासी' या पुस्तकात मिळते. या कार्यात डांगच्या बाजूने मराठीविषयी खारीचा वाटा उचलणारे दादासाहेब बिडकर यांनी काही सहकाऱ्यांच्या मदतीने मुल्हेर येथे २३ जून १९३७ रोजी स्थापन केलेल्या 'डांग सेवा मंडळा'च्या "डांग प्रदेशात मराठी शाळांचा विस्तार सुमारे १४० शाळांपर्यंत झाला होता. डांगमध्ये मंडळाच्या शाळांपुर्वी ख्रिश्चन मिशनरी लोकांनीही आपल्या शाळा मराठीतूनच चालवल्या होत्या."[४३]

याच डांग सेवा मंडळाने डांगमधील रंभास येथे दि. ०७ जुलै १९५८ रोजी मराठी आश्रमशाळा सुरु केली.[४४, ४५] येथे आजही आश्रमशाळा पाहायला मिळते परंतु ती सध्या गुजराती माध्यमातून चालू आहे. हीच पूर्वी मराठी माध्यमातील असावी असा अंदाज बांधता येतो.

आजही डांगमध्ये साठ सत्तर वर्षांवरील वृद्धास विचारले असता ते त्यांचे शिक्षण मराठीतून जेमतेम ३री, ४थी झाल्याचे सागून पूर्वी या भागात सर्व मराठी शाळा होत्या अशी नोंद करतात. याचे उत्तम उदाहरण म्हणजे गुजराती लोकसाहित्याचे अभ्यासक डॉ. प्रभुभाई आर. चौधरी यांचे वडील इयत्ता ३री मराठी शिकले आहेत असे ते म्हणतात.[४६] याचा अर्थ डांगमध्ये खरोखर मराठी शाळा होत्या हे नाकारता येत नाही.

अशा पद्धतीने औपचारिक शिक्षणाचा परिचय करून देता येईल. त्याचप्रमाणे अनौपचारिक शिक्षणाचाही परिचय करून घेणे अगत्याचे वाटते.

### *१. ब. ७. २. अनौपचारिक शिक्षण:*

डांग येथील आदिवासी समाज दरी खोऱ्यात, डोंगर कपारीत राहिल्याने तो प्रगत व शहरी संस्कृतीपासून दूर राहिला आहे. त्यांच्या लोकजीवनात मौखिक व पारंपरिक लोकशिक्षणाची परंपरा आहे. शिकारीचे कौशल्य असेल, शेतीचे कौशल्य असेल, बांबूपासून बनवल्या जाणाऱ्या वेगवेगळया वस्तू असतील, लाकडापासून बनवल्या जाणाऱ्या वेगवेगळया वस्तू असतील, घरांची बांधणी किंवा दुरुस्ती असेल आणि या सगळयांसाठी लागणाऱ्या वेगवेगळया अवजारांचे ज्ञान, तंत्र आणि त्यांचा योग्य तो वापर यांचे कौशल्य असेल, हे सगळे ज्ञान व कौशल्य ते परंपरेने आपल्या घरातील मोठ्या माणसांकडून, मित्र-मैत्रिणींकडून, आई-वडिलांकडून, आप्तजनांकडून, एकूणच काय तर सगळया समाज घटकाकडून शिकत असतात.

एखाद्या लग्नातील गाणी, होळीची गाणी, दिवाळीची गाणी, पाचवीची गाणी, डोंगऱ्या देवाची गाणी किंवा वेगवेगळया प्रसंगी सांगितल्या जाणाऱ्या कथा, उखाणे, म्हणी, वाक्प्रचार इत्यादींचे ज्ञान ते मौखिक स्वरुपात आणि परंपरेने प्राप्त करून घेतात. यासाठी त्यांना कोणत्याही प्रकारच्या शाळा महाविद्यालये उपलब्ध नसतात आणि त्याची त्यांना गरजही नसते.

तसेच आरोग्याची काळजी घेण्यासाठी ते पारंपरिक पद्धतीचे उपचार करून घेतात. त्यामध्ये घरगुती उपचार असतील किंवा भगताकडून करून घेतलेले उपचार असतील, घरातील कोणी आजारी पडल्यास पहिले घरी उपचार नंतर भगताकडे आणि नाहीच सुधारले तर रुग्णालयात अशा टप्प्याने ते जातात. परंतु त्यांचा रुग्णालयातील आधुनिक औषधांपेक्षा भगताने दिलेल्या वनौषधीवर, तंत्रा-मंत्रावर जास्त विश्वास असतो. भगताकडे काही दुर्मिळ वनौषधी असून त्या खूप गुणकारी असतात अशी त्यांची श्रद्धा आहे. या अनौपचारिक शिक्षणात त्यांचे पारंपरिक ज्ञान, संस्कृती, पद्धती, रीतीरिवाज यांचाही समावेश होतो. अशा पद्धतीने डांगी आदिवासींचा मौखिक आणि पारंपरिक पद्धतीने ज्ञान प्राप्त करून घेण्याकडे जास्त कल आहे.

**१. ब. ८. सद्यस्थिती:**

डांग जिल्ह्याची सद्यस्थिती ही https://dangs.gujarat.gov.in या संकेतस्थळावरून उपलब्ध करून घेतली आहे. ती खालीलप्रमाणे...

१) जिल्ह्यात एकूण गावे- ३११.

२) ग्रामपंचायत- ७०.

३) नगरपालिका- ०२

४) तालुके- ०३ (आहवा, वघई, सुबीर).

५) जिल्ह्याचे मुख्यालय- आहवा.

६) एकूण क्षेत्रफळ- १७६८ चौ. किमी.

७) २०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या- २,२६,७६९.

८) साक्षरता- ६०.२३% (पु. ७१.३५%, स्त्री. ४८.९९%).

९) दर हजारी पुरुषांमागे ९८६ स्त्रिया.[४७]

जिल्ह्याचे मुख्यालय आहवा हे आहे तर डांग हे प्रादेशिक नाव आहे आणि तेच नाव या जिल्ह्याला देण्यात आले आहे. हा जिल्हा क्षेत्रफळाच्या दृष्टीने अतिशय लहान आहे परंतु तो जंगल संपत्तीने संपन्न असल्याने त्याला गुजरातमध्ये खूप महत्त्व प्राप्त झाले आहे. ह्या जिल्ह्यात गेल्या दशकापर्यंत एकच तालुका होता. म्हणजे जिल्हाही तोच आणि तालुकाही तोच फक्त फरक इतकाच की पत्त्यावर लिहिताना जिल्हा डांग तालुका आहवा असे लिहावे परंतु प्रादेशिक दृष्ट्या विभाग एकच. आता मात्र आहवा, वघई आणि सुबीर असे तीन तालुके आहेत.

**१. ब. ९. समारोप:**

प्रस्तुत पहिल्या प्रकरणाचा अभ्यास करताना काही गोष्टी प्रकर्षाने जाणवतात त्या अशा की, लोकसाहित्याची सध्याच्या पिढीला नितांत गरज असून त्याची मात्र त्यांना जाणीव दिसत नाही. लोकसंचित लोकवाङ्मय दिवसेंदिवस कमी होत आहे. ते काही कालांतराने नष्टही होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. कारण जुने जाणते लोक काळाच्या पडद्याआड होत आहेत आणि नव्या पिढीला आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात ते मागासलेले वाटते आहे. म्हणून ते त्याकडे जाणून बुजून दुर्लक्ष करत आहेत. परिणामी लोकसाहित्याचा अमूल्य ठेवा जो आपल्या पूर्वजांनी शेकडो हजारो वर्षांपासून परंपरेने जपून ठेवला तो आज नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. त्याला किमान लिपीबद्ध करून पुढच्या पिढीला उपलब्ध करून देणे हेच या अभ्यासाचे उद्दिष्ट आहे.

डांगच्या परिचयाबद्दल असे दिसते की, डांग हे एक प्रादेशिक नाव असून त्याचे वेगवेगळ्या अभ्यासकांनी वेगवेगळे अर्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे. असे असूनही त्यातून ढोबळमानाने एकच अर्थ सूचित होतो हे एक विशेष आहे. यातून शक्य तेवढा डांग आपल्या समोर मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामध्ये डांग शब्दाचा अर्थ असेल, डांगचे भौगोलिक स्थान असेल, सामाजिक स्थान असेल, ऐतिहासिक स्थान असेल, राजकीय स्थान असेल किंवा शैक्षणिक स्थान

असेल या सर्वांचा यथायोग्य विचार येथे केला आहे. वाचकांना व अभ्यासकांना याचा निश्चितच उपयोग होईल अशी खात्री वाटते.

*****

**संदर्भ:**


१) पाटील राहुल (संपा.), संशोधन मुद्रा, स्नेहवर्धन प्रकाशन- पुणे, प्रथमावृत्ती: १ जानेवारी २०१६, पृ.९७.

२) तत्रैव. पृ. १८७.

३) देवरे रमेश कृ. (संपा.), लोकसाहित्य दर्शन, कर्मवीर प्रकाशन-पुणे, प्रथमावृत्ती: ७ जुलै २००९, पृ.९२.

४) तत्रैव. पृ. ४३.

५) महाराष्ट्र लोकसाहित्य माला-पुष्प चौथे, महाराष्ट्र लोकसाहित्य समिती-पुणे, प्रथमावृत्ती: १९६०, पृ.अनुक्रमणिका पहावी.

६) जोशी पं. महादेवशास्त्री (संपा.),भारतीय संस्कृतीकोश, तिसरा खंड, प्रोफिशंट पब्लिशिंग हाउस-पुणे, आवृत्ती: मार्च २०१०, पृ.७६७.

७) पवार पुंडलिक सी., डांगी लोकगीतो, आशिष पब्लिकेशन- आणंद, प्रथम आवृत्ती: २००६, पृ. १५.

८) झांबरे स. ध. (संपा.), साकेत मराठी-मराठी शब्दकोश, साकेत प्रकाशन, नवीन आवृत्ती: २०१०, पृ. १३९.

९) आपटेवा.गो., अनमोल मराठी शब्दरत्नाकर, अनमोल प्रकाशन-पुणे, आवृत्ती: २००५, पृ. ६२४.

१०) जोशी लक्ष्मणशास्त्री (प्र. संपा.), मराठी विश्वकोश खंड-६, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ-मुंबई, प्रथम प्रकाशन: १९७७, पृ. ९६२.

११) चौधरी प्रभू आर., दस डांगी लोककथाओ, पार्श्व पब्लिकेशन-अमदावाद, प्रथम आवृत्ती: २०१०, पृ.११.

१२) https://dangs.gujarat.gov.in (दि. १०/१२/२०१६)

१३) जोशी लक्ष्मणशास्त्री (प्र. संपा.), मराठी विश्वकोश खंड-६, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ-मुंबई, प्रथम प्रकाशन: १९७७, पृ. ९६२.

१४) चौधरी प्रभू आर., दस डांगी लोककथाओ, पार्श्व पब्लिकेशन-अमदावाद, प्रथम आवृत्ती: २०१०,पृ.११.

१५) जोशी लक्ष्मणशास्त्री (प्र. संपा.), मराठी विश्वकोश खंड-६, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ-मुंबई, प्रथम प्रकाशन: १९७७, पृ. ९६२.

१६) पवार पुंडलिक सी., डांगी लोककथाओ (समज अने समीक्षा), आशिष पब्लिकेशन- आणंद, प्रथमआवृत्ती:२००६, पृ. १५.

१७) www.odcities.org/shabarikumbh... (दि. २८/०१/२०१७)

१८) तत्रैव.

१९) तत्रैव.

२०) महाराष्ट्र लोकसाहित्य माला-पुष्प चौथे, महाराष्ट्र लोकसाहित्य समिती-पुणे, प्रथमावृत्ती: १९६०, पृ.२.
२१) कुलकर्णी शौनक, महाराष्ट्रातील आदिवासी, डायमंड पब्लिकेशन्स-पुणे, प्रथमावृत्ती: ऑक्टोबर२००९, पृ. १३-१४.
२२) तत्रैव. पृ. १४.
२३) गारे गोविंद, महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन-पुणे,तृतीयावृत्ती:२०१२, पृ. १११.
२४) चौधरी प्रभू आर., डांगी लोकगीतो एक अभ्यास, पार्श्व पब्लिकेशन-अमदावाद, प्रथमावृत्ती:२०१२, पृ.१६.
२५) गारे गोविंद, वारली चित्र संस्कृती, श्रीविद्या प्रकाशन-पुणे, चतुर्थ आवृत्ती: जानेवारी २०१६, पृ. ५९.
२६) तत्रैव. पृ. ५८.
२७) गारे गोविंद, महाराष्ट्रातील आदिवासी जमाती,कॉन्टिनेन्टल प्रकाशन-पुणे, तृतीयावृत्ती: २०१२, पृ. ६५.
२८) महाराष्ट्र लोकसाहित्य माला-पुष्प चौथे, महाराष्ट्र लोकसाहित्य समिती-पुणे, प्रथमावृत्ती: १९६०, पृ. ६४.
२९) चौधरी प्रभु आर., डांगी लग्नगीतो एक अभ्यास, पार्श्व पब्लिकेशन- अमदावाद, प्रथमावृत्ती:२०१२,पृ.१७.
३०) महाराष्ट्र लोकसाहित्य माला-पुष्प चौथे, महाराष्ट्र लोकसाहित्य समिती-पुणे, प्रथमावृत्ती: १९६०, पृ. ४-५.
३१) तत्रैव. पृ. १७-१८.
३२) तत्रैव. पृ. १८.
३३) रोंगटे तुकाराम, आदिवासी आयकॉन्स, संस्कृती प्रकाशन-पुणे, प्रथमावृत्ती: ४ एप्रिल २०११, पृ.४.
३४) महाराष्ट्र लोकसाहित्य माला-पुष्प चौथे, महाराष्ट्र लोकसाहित्य समिती-पुणे, प्रथमावृत्ती: १९६०, पृ.४.
३५) पवार पुंडलिक सी., डांगी लोकगीतो (एक स्वाध्याय), आशिष पब्लिकेशन- आणंद, प्रथम आवृत्ती:२००६, पृ. ३२.
३६) कापडणीस शं. क., बागलाण इतिहास दर्शन, प्रकाशन काळ: फेब्रुवारी १९९९, पृ. ३१.
३७) चौधरी प्रभू आर., दस डांगी लोककथाओ, पार्श्व पब्लिकेशन-अमदावाद, प्रथम आवृत्ती: २०१०, पृ.१५.
३८) तत्रैव. १८.
३९) https://mr.m.wikipedia.org (दि. ३१/०१/२०१७)
४०) दीक्षित सदाशिव, कर्मयोगी नानासाहेब दीक्षित यांचे चरित्र-डांगचा सिंह, प्रकाशन दि. २८ मे १९८८ रोजी लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या शुभहस्ते, पृ. १२२-१२५.

४१) https://mr.m.wikipedia.org (दि. ३१/०१/२०१७)
४२) कुलकर्णी शौनक, महाराष्ट्रातील आदिवासी, डायमंड पब्लिकेशन्स-पुणे, प्रथमावृत्ती: ऑक्टोबर २००९, पृ. ९०.
४३) दीक्षित सदाशिव, कर्मयोगी नानासाहेब दीक्षित यांचे चरित्र-डांगचा सिंह, प्रकाशन दि. २८ मे १९८८, रोजी लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या शुभहस्ते, पृ. ११०.
४४) तत्रैव. पृ.१२०.
४५) धारणकर सरल, दादासाहेब बिडकर वसा:आदिवासी सेवेचा, राजहंस प्रकाशन-पुणे, प्रथमावृत्ती: मार्च २०१२, पृ. ५८.
४६) चौधरी प्रभू आर., दस डांगी लोककथाओ, पार्श्व पब्लिकेशन-अमदावाद, प्रथम आवृत्ती: २०१०, पृ. ३००.
४७) https://dangs.gujarat.gov.in (दि. १०/१२/२०१६)